सती • उमा

अक्षय कथा

Raot
1584

लेखिका : शांता रामेश्वर राव
स्वैर रुपांतर : दुर्गा भागवत

Rao
1584
10.8.15

अक्षय
कथा

सती
उमा

लेखिका शांता रामेश्वर राव
स्वैर रूपांतर दुर्गा भागवत

APSS LIBRARY
1584

ओरिएंट लॉंगमन

ओरिएंट लाँगमन लिमिटेड
रजिस्टर्ड कार्यालय
५-९-४१/१ बशीरबाग, हैद्राबाद ५०० ०२९
इतर कार्यालये
कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८
१७ चित्तरंजन ॲव्हन्यू, कलकत्ता ७०० ०७२
१६० अण्णा सलाई, मद्रास ६०० ००२
१/२४ असफअली मार्ग, नवी दिल्ली ११० ००२
८०/१ महात्मा गांधी मार्ग, बंगळूर ५६० ००१
५-९-४१/१ बशीरबाग, हैद्राबाद ५०० ०२९
जमाल रोड, पाटणा ८०० ००१

© ओरिएंट लाँगमन लिमिटेड, १९८७

Rao
1584
10.8.15

ISBN 0 86131 770 X

मूळ पुस्तक इन वरशिप ऑफ शिव लेखिका शांता रामेश्वर राव
इंग्रजी © ओरिएंट लाँगमन लिमिटेड १९८६
या पुस्तकातील मजकूर ओरिएंट लाँगमनतर्फे १९७४, १९७६, १९७७, १९८१ आणि १९८२ या साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातील मजकूरावर आधारीत आहे.
फोटो टाईप सेटिंग : कुलभूषण कॉम्प्यूसेट कॉर्पो., रानडे रोड, दादर, मुंबई २८
मुद्रक : शांतादुर्गा प्रिंटर्स (प्रा.) लिमिटेड, ३१६ चंपकलाल इंडस्ट्रीयल इस्टेट, शीव, मुंबई ४०० ०२२
प्रकाशक : ओरिएंट लाँगमन लि., कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

सती

गोष्ट आहे सतीची. प्रीतीची. भीतीची. अमर श्रद्धेची. ब्रह्मदेवानं सृष्टी निर्माण केली तेव्हा त्यानं आपल्या पुत्राला दक्षाला प्रजापती असं बिरूद दिलं. प्रजापती म्हणजे देवांचा, मानवांचा, पशु-पक्ष्यांचा अधिपती, शास्ता धर्माचं, आचारांचं, सदाचारांचं पालन सर्व करत आहेत की नाही ते पाहण्याकरता दक्षाला ब्रह्मदेवानं हे पद दिलं. नियमांचं उल्लंघन कुणी करू नये, सर्वत्र देवांचं आणि माणसांचं स्वराज्य यावं म्हणून दक्षाची योजना ब्रह्मदेवानं केली. दक्ष आपल्या ब्रीदाला जागला.

दक्ष प्रजापतीनं मनूची मुलगी प्रसूती हिच्याशी आपलं लग्न लावलं. विवाहविधी साक्षात ब्रह्मदेवानं केला. दक्षाला साठ मुली झाल्या. सती ही त्यांच्यापैकी एक. वडिलांची ती अतिशय लाडकी होती.

ब्रह्मदेवानं दक्षाला जे वरदान दिलं त्यामुळे दक्षाला रात्रंदिवस आपल्या कर्तव्याच्या पालनाचं जणू वेडच लागलं. देवांपैकी कुणी काही अनाचार करतो आहे का, कुठे शिस्तीची घडी तर मोडत नाही ना,

देवधर्म, आचार यांचं पालन नीट होत आहे ना याची काळजी त्याला क्षणभर सोडत नव्हती. त्या काळजीनं, जबाबदारीच्या जाणिवेने त्याच्यात विलक्षण करडेपणा आला.

देवांनाही दक्षाची जरब बसली. पण त्याबरोबरच दक्षाचा अहंकार वाढत गेला. आपल्या मोठेपणाची, आगळेपणाची जाणीव त्याच्यात वाढू लागली. त्या डामडौलाची राहाणी आली. त्याचा प्रासाद, त्यातलं ऐश्वर्यही त्याच्या बलाढय सत्तेची निशाणी बनली. दक्षाचं सारंच काही न्यारं होतं. त्याच्या नुसत्या नावानेच देवही थरारत. मग इतरांची तर गोष्टच सोडा.

सतीखेरीज इतर सर्व मुलींची लग्नं दक्षानं थोरामोठ्या देवांशी लावून दिली. आपल्या ऐश्र्वयाला शोभतील असे इभ्रतदार जावई त्यानं आपल्या मुलींना वर म्हणून निवडले. देवांना दक्षाचा जावई होणे म्हणजे फार मोठा सन्मान वाटायचा. मुलींची लग्न त्याने थाटामाटात केली हे काय सांगायला हवं? प्रत्येक सोहळ्यात, प्रत्येक यज्ञविधीत झाडून साऱ्या देवांना आमंत्रण जायची.

दक्षाच्या मुलींना, आपल्याला असा पिता मिळाला यातच धन्य धन्य वाटायचं. त्याच्या घरी सदा

समारंभ नि कार्य चालायची. एकापेक्षा एक समारंभ मोठा. तेव्हा त्या मुलींना किती नटू नि किती नको असं व्हायचं. त्यांना मिरवण्यात नि मुरकण्यात अपार अभिमान वाटायचा. रत्नांचे अलंकार, नि रेशमी जरतारी वस्त्रं यांनी त्या सदा नटलेल्या असायच्या. त्या सुंदर मुलींना आपल्या भाग्याला पारावारच नाही असे वाटे.

दक्षाघरचे समारंभ ही इतरही साऱ्यांना अपूर्वाई वाटायची. देवांना तर यांचे आमंत्रण आले म्हणजेच कोण असे वाटे. त्यांच्यात व मानवांमध्ये दक्ष-प्रजापतीला खूष करून त्याच्या मर्जी राखण्यात सारखी चुरस चालायची. वृद्ध प्रजापतीबद्दल गौरवाला अंतच राहिला नाही.

दक्षालाही आपण घालून दिलेले दंडक, नेमनियम नि व्यवहार सारेजण आपसुक पाळतात म्हणून पराकाष्ठेचा संतोष होत होता. जणू त्याचे नियम निसर्ग-नियमच झाले होते. त्याचा अहंकार गगनाला भिडत होता. समारंभांचं सत्र अखंड चालू होतं. देव नि मानव त्याची पूजा करण्यात जिवाचं सार्थक मानत होते. मग अहंकार वाढणार नाही तर काय?

सारे काही व्यवस्थित चाललेलं पाहून दक्षाला अपार समाधान वाटत होतं नि म्हणून कशात

काहीच बदल होऊ नये असं त्याच्या मनानं घेतलं. दक्ष स्वतःला आता केवळ सृष्टीचाच नव्हे तर कालचक्राचाही मध्यबिंदू आपणच आहोत असं मानू लागला होता. जगाचं रहाटगाडगं त्याच्या इच्छेनं तसेच अखंड चालत राहाणार आहे असं त्याला वाटू लागलं होतं.

आख्या जगात कुठं काही खुट्ट होत नव्हतं. कुणी काही प्रश्न विचारत नव्हतं. कुणाच्या मनात कसलाच संशय नव्हता. कशाला काही आव्हानच येण्याचा संभव नव्हता. सारं काही कसं सुरळीत, सुसूत्र चाललं होतं. दक्ष आपल्या राज्याकडे पाहे तेव्हा त्याला अभिमानाचं भरतं येई. त्याचा आनंद उचंबळू लागे, 'धन्य मी' असं त्याला वाटे.

पण घरात मात्र एक गोष्ट त्याला अस्वस्थ करू लागली. त्याच्या धाकट्या लेकीला-सतीला-नखरा, डामडौल, दागदागिने घालून मिरवणं या कशाचाच सोस नव्हता. किंबहुना त्याबद्दल तिला तिटकारा होता. तिला तिच्या वडिलांनी केलेले यज्ञ, धर्मकर्म फार आवडायचे. आपली मुलगी एवढी मूर्ख कशी याचे त्याला दुःख वाटे. रागही येई.

आणखी एक दक्षाला त्रासदायक वाटत असणारी

गोष्ट होती. सतीची नजर सारखी दूरवर लागलेली असे. कुठे तरी दूरवरच्या निळ्यानिळ्या पर्वतांच्या रांगावर राजप्रासादातून ती सरळ बाहेर पडून रानावनात भटकत राहायची. फुलं नि रानफळं वेचायची. रानातल्या पशुपक्ष्यांशी खेळायची नि रानातल्या वन्य लोकांशी नि गोरगरीब शेतकऱ्यांशी बोलाचालायची. काही केलं तरी घरात म्हणून तिचा पाय ठरायचा नाही. तिला अडवणं कुणालाच शक्य झालं नाही. घरातल्या व वडिलांना ज्या ज्या गोष्टीत स्वारस्य वाटायचं त्यात हिचं मनं कधी रमलंच नाही. घराण्याची प्रतिष्ठा, लोकांचं मत, रूढी, कुळाचार नि जुनं ते सोनं हे तिला पटायचंच नाही.

दक्षाच्या घरात वेगळेपणानं वागणं हाच मुळी गुन्हा होता तेव्हा सतीच्या बहिणींना तिचं स्वच्छंदी वागणं मुळीच आवडायचं नाही. ही अशी कशी? असंच त्यांना वाटायचं. पण नेमकं तिच्या कुठल्या एका गोष्टीवर त्यांना वाईट म्हणून बोट मात्र ठेवता यायचं नाही.

आणि ठेवणार तरी कसं? सतीचा बाणा स्वतंत्र होता तरी तिच्या हातून कसलंही गैर घडत नव्हतं. कुणालाही ती काही इजा करायची नाही, त्रास द्यायची नाही. बहिणींना तिच्या वागण्यात शोधून

सुद्धा काही न्यून सापडेना. म्हणून तर त्या तिच्यावर जास्तीच चिडून असायच्या.

सतीमध्ये जो चांगुलपणा होता तो काही कुठल्या नियमातून आलेला नव्हता. तो तिचा अंगगुणच होता. ती स्वतः होती तशी राहायची म्हणून तो आलेला होता. तिच्या बहिणीचं वर्तन मात्र वडिलांनी नि समाजानं घालून दिलेल्या ओळीप्रमाणे, कडक शिस्तीप्रमाणे होतं. सती ज्या नियमानुसार चालली होती तो नियम तिच्या अंतरंगाचाच एक भाग होता, हे त्या बापड्यांना कळलं नाही म्हणून सतीबद्दलचा त्यांचा दुस्वास वाढला.

एक दिवस एक विलक्षण बातमी चहूकडे पसरली. सतीचं मन शिवावर जडलं आहे ही वार्ता घरी, दारी, राज्यात सर्वत्र गेली. गावगप्पा रंगू लागल्या.

"कोण कुठला शिव आणि ही सती त्या शिवावर, त्या नंग्या गोसावड्यावर प्रेम करते? तो तर ठार वेडा! सदा भीक मागत भटकत असतो. हिमालयामध्ये बर्फाच्या राशीत राहतो." एक ना दोन गोष्टी लोक बोलू लागले. सतीच्या बहिणींच्या कानीही याची कुणकुण आली.

आपली मुलगी शिवावर प्रेम करते ही गोष्ट दक्षाच्या कानी गेली तेव्हा त्याच्या रागाला पारावार

राहिला नाही. त्याला शिवाचा अतोनात तिटकारा! त्याच्या मते शिव जात-पात नसलेला. अस्पृश्यच. समाजाचा एक कलंक होता. प्रतिष्ठितांना खाली बघायला लावणारा शिव स्वतःला महादेव म्हणवतो खरा पण स्वतः भिकाऱ्याच्या वेषात भटकत असतो. त्याची वस्त्रं, भूषणं काय तर वाघाचं कातडं नि सर्प. गळ्यात माणसांच्या मुंडक्यांची माळ. भले लोक अंगाला सुगंधी चंदनाची उटी लावतात, तर हा फासतो स्मशानातली राख.

दक्षाचा शिवावरचा राग वेगळ्याच कारणांमुळे होता. ब्रह्मदेवाने दक्षाला प्रजापती केलं त्या दिवशी प्रजापतीची इच्छा सर्वांनी आपली थोरवी ओळखून आपल्याला मानमरातब द्यावा ही होती. पण त्याला नमस्कार करायचं तर राहोच पण त्याची दखलसुद्धा न घेणारा एकच देव होता. तो म्हणजे हा शिवच. दक्ष किंवा दक्षाची दुनिया कैलासात राहणाऱ्या शिवाच्या खिजगणतीतही नव्हती.

आता शिवानं मुद्दाम त्याचा अनादर करण्याचे ठरवून तो असं वागला असं नव्हे. तो आपल्याच नादात होता या गोष्टी त्याला सुचल्याच नाहीत. त्याच्या मनात दुसरेच विचार घोळत होते आणि ते विचार दक्ष प्रजापतीपेक्षा अधिक फलदायक आहेत

असं मात्र जरूर त्याला वाटलं.

पण आपल्याकडे दुर्लक्ष केलं जाणं ही गोष्टच दक्षाला माहीत नसल्यामुळे त्याच्या मनाला ही उपेक्षा झोंबली.

दक्ष ताबडतोब उठला आणि त्याने शिवाला शिव्यांची लाखोली मोजली. त्यानं त्याचं दारिद्र्य काढलं. त्याचा राकट वेष उद्धारला. पण इतकं करून कैलासाच्या त्या देवावर त्या क्रोधाचा नि शिव्यांचा काहीही परिणाम झाला नाही. त्याच्या कानात ते शब्द विरलेच नाहीत कारण त्याचं चित्त अधिक उदात्त विचारात गुंतलेले होतं.

हे पाहून तर दक्षाचा राग हजारपटीने वाढला. त्याने दात ओठ खाल्ले. शिवाला तो आपला सर्वात मोठा शत्रू मानू लागला.

सतीनं स्पष्टपणे आपलं प्रेम शिवावर आहे हे जाहीर करून टाकलं. भीत भीत दक्षाला प्रसूतीने सतीच्या प्रेमाची गोष्ट सांगितली तेव्हा दक्षाने उलट तिलाच धारेवर धरलं. ''मी ज्याचा आत्यंतिक तिटकारा करतो त्याच्यावरच आपली पोरगी भाळली! ही पोरटी द्वाड आहे. आज्ञा मानीत नाही. बंडखोर आहे कारटी. तूच तिला बिघडवलंस.''

''अजून ती पोरच आहे हो'' प्रसूती धाडस करत म्हणाली.

''ती मला जुमानीत नाही ही इंगळी. मी देवाचा प्रजापती असून ती मला मोजीत नाही ना? बघतोच मी कुठं आहे ती? आणा तिला माझ्यासमोर '' असं दक्षानं रागाने म्हटल्यावर सती त्याच्यासमोर उभी राहिली.

दक्षानं प्रश्न विचारायला सुरुवात केल्यावर तिनं काहीही न लपवता त्यांना उत्तरं दिली. नवतारूण्यामुळे मुसमुसणारी ती सुंदर सती पित्यासमोर उभी राहून न डगमगता खरं बोलत होती.

''शिवावर त्या अनंतेश्वरावर मी जीव ओतून प्रेम करीत आले आहे आणि पुढेही मी तेच करीन.'' सती उत्तरली.

''अग, दुष्ट मूर्ख पोरटे, तो माझा सर्वात मोठा शत्रू आहे हे तुला माहीत नाही? माझ्या रोमारोमात त्यांच्याबद्दल द्वेष भरला आहे.''

''बाबा! याचं कारण तुम्ही त्यांना खरंखुरं ओळखलतंच नाही. त्यांच्या किरकोळ गोष्टी तुम्ही बघता. त्यांचं दारिद्र्य, त्यांचं साधं रूप. पण तुम्हाला त्यांचा चांगुलपणा कधी दिसलाच नाही. त्यांची

चमकदार बुद्धी, त्यांची प्रज्ञा आणि त्यांची अनंत अशी आकलनशक्ती हे काहीच तुम्ही पाहिलेलं नाही".

"अरेच्या! ही तर मला वाटलं त्याहून फारच वेडी आहे." दक्ष रागाने काळा निळा होऊन उद्गारला. "मला उलट उत्तर देण्याइतकं तुला अवसान आहे हं!"

"दक्षाचे डोळे आग ओकू लागले. त्याच्या आवाजात जरब आली. "अग मूर्ख पोरटे, या कृत्यापायी होणाऱ्या शिक्षेतून तू सुटशील असं वाटतं का तुला ?"

"माझं त्यांच्यावर प्रेम आहे हो, बाबा. खरंच प्रेम आहे." सतीचे डोळे भरून आले. "माझं त्यांच्यावर प्रेम आहे हे तुम्हांला कसं समजावून देऊ?" सती अगतिक झाली.

" दळभद्री, ओंगळ, भिकमाग्या भटक्या" असं तो रागाने पुटपुटत खोलीत फेऱ्या मारू लागला. "त्याच्याजवळ नाव घेण्यासारखं आहे काय? काही नाही. घर नाही, कुटुंब नाही, पद नाही, प्रतिष्ठा नाही, पैसा अडका नाही. जमीनजुमला नाही. विद्या नाही. तुला त्याच्यावर प्रेम करायला काही कसं वाटलं नाही?"

सतीला वडिलांची कीव आली. "बाबा, या गोष्टींच्या पलीकडचं त्याचं विशाल हृदय, त्यांचं चांगलं मन तुम्हाला दिसतच नाही का? त्यांच्या चेहऱ्यावरची चमक तुम्हाला कधीच दिसली नाही?" आता तिचा चेहराही प्रेमावेगाने तेजाळला. ती बोलतच राहिली. "त्यांना घर नाही असं तुम्ही म्हणता. पण बाबा, ते जगतात तिथं त्यांचं घरं असतं. त्यांचं घर सर्वत्र आहे कारण तसं ते कुठेच नाही. त्यांना कुटुंब नाही असं तुम्ही म्हणता, पण शिव एकटे, एकाकी आहेत म्हणूनच सर्व जगच त्यांचं कुटुंब आहे. घर आहे,"

"त्याचं नावंही तू माझ्या वाड्यात घेऊ नकोस." दक्ष सतीच्या अंगावर ओरडला. "ही गोष्ट लाज आणणारी आहे. तोंडाला काळोखी फासणारी आहे." एवढंच बोलून तो थांबला नाही. त्याने तिला खोलीत कोंडून ठेवायची आज्ञा केली. "ती चांगली शुद्धीवर येईपर्यंत तिला कोंडून ठेवा." त्याचा राग त्याच्या अंगात मावत नव्हता.

"हिला आता उजवलीच पाहिजे" असं मोठ्याने ओरडून दक्षानं टाळी वाजवली. नोकर चाकर धावत आले. "सतीच्या स्वयंवराची ताबडतोब तयारी करा. साऱ्या देवांना आमंत्रण पाठवा" त्याने फर्मावले.

नोकर लगबग करू लागले तेव्हा दक्ष काहीसं आठवून म्हणाला, "साऱ्या देवांना आमंत्रण पाठवा असं मी म्हणालो का? पण ऐका. ते बरोबर नाही. एकजण स्वतःला देव म्हणवतो पण तरी त्याला आमंत्रण पाठवू नका. शिवाला आमंत्रण देऊ नका."

कोंडलेल्या सतीला फिरून आपल्या समोर उभी करून दक्षानं सांगितलं, "ऐक, तुझं स्वयंवर ठरवलं आहे, देवांना आमंत्रण दिली आहेत. त्यातला योग्य पती तू निवड." हे शब्द ऐकून सती लाजली. आनंदली. तिच्या मनात आशा पालवली. ज्या शिवाला आपण रात्रंदिवस भजतो, पूजतो, त्या महादेवाला आमंत्रण दिलं नसेल अशी पुसटशी शंकाही तिला आली नाही. तो स्वयंवरला येणारच अशा उमेदीत ती हुरळून गेली.

दक्षाचे शब्द आणि मुलीचा प्रफुल्ल चेहरा पाहून जवळ उभी असलेली प्रसूती मात्र अस्वस्थ झाली. तिला आठवलं की बालपणी सतीने उच्चारलेला पहिला शब्द शिव हाच होता. कैलासनाथावर सती जिवापाड प्रेम करते हे तिला माहीत होते.

प्रसूतीनं सौम्य शब्दात पतीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण दक्षाने तिचे बोलणे उडवून लावलं. आपल्या हातात सारं काही आहे अशीच त्याची ठाम समजूत होती.

दक्षाच्या घरच्या स्वयंवराचा थाट काय विचारावा? देव आधीच सुंदर. त्यात त्यांनी उंची पोशाख केलेले, झगझगीत अलंकार घातलेले. दक्षाच्याभोवती देवांनी कडे केले होते. त्याचा प्रत्येक शब्द ते आतुरतेने झेलत होते. साऱ्या देवांनी नमस्कार केल्यावर दक्षाची छाती गर्वाने फुलून गेली.

पण क्षणभरात काय झालं कुणास ठाऊक. त्याच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं. कपाळावर आठी पडली. एक आठवण त्याला सतावू लागली. मनातून ती काढून टाकायची म्हटली तरी जाईना. शिव आपल्याला वरच्यावर का बरं आठवतो आहे? शिवानं आपल्याला नमस्कार केला नाही. त्याला आपलं ऐश्वर्य, विद्या आणि पद यांची काही प्रतिष्ठा वाटली नाही. हीच ती खंतभरली आठवण दक्षाला बोचत होती.

"बरं झालं आज तो इथं स्वयंवराला आलेला नाही. आता त्या मूर्ख पोरटीला आपण यापैकीच एकाला माळ घालायला लावूच लावू." तो स्वतःशी पुटपुटला.

वधूवेष केलेली सती स्वयंवराच्या मंडपात आली. सारे देव तिच्यासाठी खोळंबून बसले होते. मंडपाच्या मध्यभागी उभी असलेली सती फारच सुंदर दिसत

होती. "तुला योग्य तो पती तू निवड." असे पित्याने सांगितल्यावर तिने डोळे वर करून साऱ्या देवांकडे पाहिले.

प्रत्येक इच्छुकाची उत्सुक नजर तिच्या चेहऱ्याकडे लागली होती. सती मंडपभर फिरली. एकदा, दोनदा, तिनदा फिरून ती परत वडिलांपाशी येऊन उभी राहिली. पाहुणे चुळबुळू लागले. प्रसूती अस्वस्थ झाली. तिनं श्वास रोखून धरला. तिचे ओठ थरथरत होते. डोळ्यात व्याकुळता होती. दक्ष हसत होता. ते विजयाचे स्मित होतं. "सारे जण आले आहेत. एकाला पती म्हणून मुकाट्याने माळ घाल." तो म्हणाला.

सतीने मान हलवली. तिच्या लक्षात आलं की आपल्या पित्यानं, सामर्थ्यशाली दक्ष-प्रजापतीन, आपल्याला फसवलं आहे! आपलं मन ज्याच्यावर बसलं आहे त्या एका देवाला त्यानं स्वयंवरातून मुद्दाम वगळलं आहे. तिचा चेहरा पडला. आपल्या पायाखाली जमीन हादरते आहे नि वरचं आकाश भोवंडतं आहे असं तिला वाटलं. "तुला वरलंच पाहिजे, आता माघारी परतणं नामुष्कीचं आहे," दक्षानं तिच्या कानात सांगितलं.

सभोवारच्या ऐश्वर्याशाली घोळक्याकडे नजर

फिरवीत ती दुःखभराने उद्गारली. "नाही. कधीही नाही. कधीच नाही." ती तनामनानं पर्वतेश्वर शिवापर्यंत पोचली होती. "प्राणेश्वरा, शिवा, "ती हलक्या आवाजात शिवाची प्रार्थना करू लागली. "जर मी तुझ्यावर जिवाभावानं प्रेम करीत असेन तर ही माळ घे नि मला स्वीकार" असे म्हणून ती वरमाला तिनं वर फेकली.

क्षणभरात जो चमत्कार झाला त्यानं सारे श्रोते थक्क होऊन गेले. अनादी अनंत शिव साक्षात त्यांच्यापुढे उभा राहिला. सती डोळे उघडून बघते तर आपण निराशेने वर फेकलेली माळ त्याच्या कंठात रूळत होती. तिचा आनंद गगनात मावेना. आपले वडील रागावले किंवा त्यांनी थयथयाट केला तरी त्यांना आपल्याला शिवाच्या हाती द्यावंच लागणार हे तिला समजून चुकलं. दक्षाला ते करावंच लागलं. पण त्यानं ते फार वाईटरीतीनं केलं. सती पाया पडली. तिनं निरोप घेतला त्यावेळी त्यानं आखडून तोंड फिरवलं. तिला साधा आशीर्वादही दिला नाही.

पण सतीला त्याचा राग आला नाही. तिच हृदय तुडुंब आनंदानं गात होते. आता ती शिवाची बायको होती. त्याच्याबरोबर हिमालयाच्या कुशीतल्या आपल्या घरी जात होती.

सारे देव आपापल्या रथांमधून परत जायला निघाले होते. शिव म्हणाला, "माझ्याजवळ रथ नाही. फक्त माझा सोशिक कष्टाळू नंदी आहे. तो माझा सेवक आहे. तो वाट दाखवील आणि आपण त्याच्या मागून खडकातली वाट पार करत जाऊ."

"त्यात काय मोठंसं?" सती उत्तरली. "तुम्ही माझ्याजवळ आहात. आपण जोडीनं एकमेकांशी बोलत चालत जाऊ. जोडीनंच गप्प बसून राहू. यानंतर आपण सारं काही जोडीनं करू. यापेक्षा मला दुसरं हवंय तरी काय?"

सती आपल्या नव्या घरी आली. बर्फाचं घरकुल. सती जे भव्य सौंदर्य अनुभवत होती ते सतीच्या स्वप्नीही कधी आले नव्हतं.

विशाल धवल पर्वत. स्तब्ध. शांत. सुंदर. त्या पर्वतांच्या भावछटा तिनं पाहिल्या. आकाश स्वच्छ असलं की त्या हिमपर्वतांची झगमगीत शुभ्रता सतीच्या डोळ्यांना दिपवायची आणि तरीही तिला आपली नजर त्यांच्यावरून काढणं जमत नसे. रात्री जाग आल्यावर ताऱ्यांच्या लुकलुकत्या प्रकाशात किंवा चंद्राच्या लखलखीत चांदण्यात ते पर्वत गूढ श्यामल होऊन उभे राहिलेले तिला दिसत.

शिव आणि सती या दांपत्याची राहणी साधी सरळ होती. अन्न अगदी घरगुती, साधंसुधं होतं. नवरा बायकोला मोठमोठ्या, श्रीमंत भेटवस्तू देत नसे. सती घरी कातलेल्या सुताचंच वस्त्र नेसत होती. दागिने म्हणाल तर गळ्यात फुलांच्या माळा नि मनगटात फुलांचे गजरे असत. उतरणीवर स्वतः जाऊन फुलं गोळा करून ती हे हार-गजरे गुंफायची. आपलं घर नटवून सजवून ती लख्ख ठेवायची. तिच्या प्रेमळ वृत्तीनेच तिच्या हातांनाही नेटकेपणा आला नि तिचं घर कसं खरखुरं घर बनलं. तिचा पती कैलासाच्या शिखरावर समाधी लावून बसला की हिच्या घरकामाला बहर यायचा.

त्यांच्या अगदी जवळंच घर म्हटलं तरी ते काही कोसांवर दूर होतं. पण सतीबद्दल त्या दूरच्या लोकांनी ऐकलं आणि माणसांचे लोंढे त्यांच्या घरी येऊ लागले. ते शेजारी तिच्यासाठी भेटी आणायचे. एखादं नुकतंच जन्मलेलं कोकरू, मधाने भरलेलं भांडं, ताज्या दुधाची लोटी, भाज्या, फळं, पसाभर धान्य, काही ना काही भेटी असायच्या. लहान मुलं आणि नव्या नवऱ्या यांना तिच्या पाया पडायला घेऊन बरीच मंडळी यायची.

शिवाबद्दल त्यांना अपार भक्ती पण त्याचवेळी

भीतीदेखील वाटे. सतीबद्दल मात्र साऱ्यांनाच प्रेम होते. ती त्यांच्याशी बोले. त्यांच्याबरोबर चार पावले चालत त्यांच्या शेतात जाई. तेव्हा शेजाऱ्या-पाजाऱ्यांना ती आल्याबरोबर भूमी उल्हसित होते, जमिनीच्या पोटातली बियाणं फुगून तर्र होतात आणि अंकुर फुटून वर येतात असं आढळून येई. ती आली की जीवनच चहूकडे संचार करत असे.

एक दिवस स्वर्गलोकातून त्यांच्या त्या एकाकी घरात अचानक पाहुणा आला. त्याला पाहून सती आनंदानं हसली. पण शिव मात्र आनंदला नाही.

"हा तर नारद!" त्याला पायवाटेने वर चढताना पाहूनच शिव म्हणाला, "यानं कुणाचं भलं केलं आहे असं क्वचितच घडतं. हा आळशी आणि उनाड आहे. काही एक कामाचा नाही आणि याचं बोलणं फार. जातो तिथं पीडा उत्पन्न करतो."

"पण त्याला कसं हाताळावं हे माहीत असलं ना तर तसं होत नाही." सती समजवल्यासारखं बोलत होती. कधी कधी सतीला आपल्याला व्यवहार चांगला कळतो असं दाखवावंसं वाटे. "हे बघा, नारद हा चतुर आणि गमतीचं बोलतो. शिवाय तो गातोही चांगला हे तर कुणी नाकबूल करणार नाही?"

नाइलाजाने का होईना पण शिवाला हे कबूल करावंच लागलं. शिवाय आता त्याला तिथून मागेही फिरता येईना. नारद आता अगदी दारात उभा राहून डाव्या हाताच्या नाजूक बोटांनी वीणेच्या तारा छेडीत लयबद्ध झंकार काढीत होता. उजव्या हाताने तो चिपळ्या वाजवत होता. त्याने स्मित केलं. लगेच त्याचे नाचरे डोळे लकाकू लागले. नारदाच्या डोळ्याची रीतच न्यारी. एकाच क्षणात ते हसल्यासारखे वाटायचे तर दुसऱ्याच क्षणी ते विचारात बुडल्यासारखे, स्वप्न बघत असल्यासारखे किंवा दुःखात डुबल्यासारखे भासायचे. नारदाच्या मनात काय चाललंय याचा थांगपत्ताही कुणाला लागायचा नाही.

"बाई ग, याच्यात काही अर्थ नाही. हा कळलाव्या आहे. गप्पिष्ट नि थापाड्या आहे. जपून रहा. त्याची बडबड नि बाता फारशा मनावर घेऊ नकोस बरं" शिवानं सतीच्या हळूच कानात बजावलं.

सतीनं हसून मान हलवून अतिथीचं स्वागत केलं. शिव तेथे फार वेळ राहिला नाही. थोड्या वेळातच तो तिथून निघून गेला.

"अहाहा!" नारद आरामशीर रेलत बोलला. "हा तर स्वर्ग आहे! इथे माणसानं खरीखुरी शांतता

भोगावी. शहरातला गजबजाट नाही किंवा घाई, गर्दी, धावपळ काही नाही. सारं कसं शांत नि स्तब्ध आहे. अगदी खेड्यातल्यासारखा साधेपणा आहे."

त्याच्या बडबडीला अंतच नव्हता. सती त्याच्या खाण्यापिण्याची सोय करण्यासाठी आत बाहेर करीत होती तरी तो बोलतच होता. त्याच्याजवळ सांगण्यासारख्या शेकडो गोष्टी होत्या.

नारद सांगत होता नि सती उत्सुकतेनं ऐकत होती. पाहतापाहता दुपार सरली. मग उन्हं कललेली पाहून तो गाऊ लागला. त्यानं सतीला आग्रह करून शिवाला आपलं गाणं ऐकायला बोलावून घेतलं.

नारदाचं गाणं इतकं बहारीचं होतं की शिवाला सुद्धा नारदाची स्तुती केल्याशिवाय राहवलं नाही. त्या संगीतानं त्याच्यावर मोहिनी घातली. सगळा ताण तणाव दूर झाला. त्या घरगुती सुंदर वातावरणात नारद एकरूप होऊन गेला.

आणि या भरात शिवानं नारदाला आपणहूनच प्रश्न केला. "नारदा, तू तर तिन्ही लोकात फिरतोस. तर दुसऱ्या लोकातली काय हकिगत आहे, सांग पाहू. आमच्या माहितीतल्या लोकांची काय बातमी आहे?"

सती समोर बसून विडे लावीत होती. हात कामात गुंतले असले तरी तिचे कान नारद काय सांगतो

त्याकडे लागले होते.

"तुमच्या माहितीतल्या लोकांची वार्ता? ऐका. सांगतो. दक्ष-प्रजापतीच्या घरी सध्या धामधूम चालू आहे." सतीकडे तिरपी नजर टाकून नारद पुढे म्हणाला, "आता कशाची म्हणाल तर यज्ञाची. आता दक्षाच्या घरी यज्ञविधीच्या समारंभाची कशी झुम्मड असते ते काही त्याच्या मुलीला माहीत नाही असं थोडंच आहे? मी बापडा काय सांगणार?"

"ते काही नाही, नारदमुनी, ते तुम्ही सांगायलाच हवं. खरंच सांगायला हवं "सती अजीजीनं बोलत होती. "आम्ही इथं साऱ्यांपासून दूर डोंगरात रहातो. आम्हाला आम्हाला कुणाची काहीच हकिगत कळत नाही. नारदमुनी, सांगा ना. माझे आईबाबा कसे आहेत? बहिणी कशा आहेत? माझे वडील कुठला नवा यज्ञ करणार आहेत?"

"तुम्हांला हे कसं कळलं नाही याचंच मला नवल वाटतंय. खरं तर तिन्ही लोकांत त्याचीच चर्चा चाललीय."

शिवानं सौम्य टोमणा हाणला. "आम्ही इथं अगदी शांतपणे रहातो बरं नारदा! आणि मला तर गावगप्पा मुळीच ऐकायला आवडत नाहीत." आता शिवाला आपण नारदाला उगीच उत्तेजन दिलं असं

वाटू लागलं.

सतीही काही कमी नव्हती. ती ताबडतोब उसळली, "माहेरची बातमी म्हणजे काही गावगप्पा नव्हेत आणि कुणा मुलीला आपल्या आईबापांबद्दल काही ऐकावसं वाटलं तर त्यात काय गैर नि नवलाचं आहे हो?" सतीच्या आवाजाला धार चढली होती.

"नसेलही" शिव म्हणाला. पण त्याच्या आवाजावरून त्याला फारसं बरं वाटलं असं काही म्हणता आलं नसतं. पण सती आता खूष झाली. नारदाकडे वळून तिनं त्याला विनवलं. "सांगा ना हो. पुढे सांगताना?"आणि नारद बोलता झाला. त्याच्या तोंडून शब्द बरसू लागले.

नारदानं वीणेच्या तारा छेडल्या. चिपळ्यांचा ताल धरला आणि यज्ञ-विधीच्या कहाणीवर कवन करून तो ते गाऊ लागला. नारदाचे भाषाप्रभुत्व त्या गीतांद्वारे स्पष्ट होत होतं. ते गीत ऐकताऐकता सती इतकी तन्मय झाली की तिच्या हातांची हालचाल देखील बंद झाली. तिच्या मांडीवर ते हात अगदी निश्चल पडून राहिले होते. जणू काही तेही ती गीत-कहाणी तिच्या संगीतानं आणि काव्यमयतेनं भारून जाऊन ऐकत होते.

ऐकताऐकता सतीच्या डोळ्यापुढे जिथं तिचं बालपण गेलं तो पित्याचा भव्य प्रासाद फिरून जसाच्या तसा तिच्या समोर उभा राहिला. आता यज्ञाची तयारी करतानाची धावपळ तिला दिसू लागली. यज्ञाची सुगंधी समिधांचा ठराविक जागी रचलेला ढीग, सोन्या-चांदीच्या पात्रात भरून ठेवलेलं लोणी, धान्य आणि दूध, जळलेली यज्ञद्रव्यं आणि विधी कर्माच्या वेळी विस्तवात पडलेल्या तुपाच्या धारा, तिला जणू प्रत्यक्ष सर्व दिसल्या. धूप आणि फुलं यांचा सुवास, ढोलांवरच्या थापा, तुताऱ्यांचं संगीत, बाहेरचा घोड्यांच्या टापांचा खडखडाट, बहिणींचा आनंदाचा हास्यकल्लोळ आणि त्यांच्या रेशमी वस्त्राची खसखस हे सारंच्या सारं नारदाच्या गाण्याने तिच्यापुढे साकारलं. तिच्या कानात संथ गंभीर वेदघोष घुमू लागले.

फिरून सतीला आपल्या पित्याचं मनोमन दर्शन झालं.उंच, कठोर जिवणीचा, अत्यंत रूबाबदार, आणि साऱ्या देवांनी समादर केलेला असा दक्ष प्रजापती. तिची तंद्री लागली. तिचे ओठ विलग झाले. श्वास जड झाला.

नारद गातच होता. गाण्यातच "साऱ्या देवदेवता तिथं असतील. साऱ्यांना अगत्याचं आमंत्रण असेल"

असं म्हणत त्याने त्यांची नावं घ्यायला सुरूवात केली. दक्षकन्यांची, सतीच्या बहिणींची नावं घेतली. त्यांच्या नवऱ्यांची नावं सांगून झाली नि नारद चपापला. एकदम गायचे थांबला. त्याचा चेहरा लालबुंद झाला. तो अडखळला, चाचरला व ओशाळला. "अर्थात तुलाही आमंत्रण आलं असणारच. धाकटी लेक बापाची लाडकीच असते. नाही का?"

हे ऐकून सती गोरीमोरी झाली. पण आपल्या मनाची चलबिचल दिसू नये म्हणून तिनं तोंड वळवलं. शिव मात्र नारदाच्या डोळ्यांकडे रोखून बघत होता. त्याने मृदु आवाजात पण खंबीरपणे सारे काही स्पष्ट केले. "नाही, नारदा आम्हाला आमंत्रण नाही. त्याची अपेक्षाही आम्ही करत नाही. झालं ते भल्यासाठीचं झालं. आम्ही आहोत तिथंच फार सुखी आहोत."

नारद मध्येच लगबगीनं बोलला. "अलबत. तुम्ही आहात. सुखी आहात. यज्ञविधी तरी काय? नुसते शब्द. पोकळ शब्द. झगमगाट. दिमाख. निरर्थक विधी . . . माझ्याबद्दल म्हणाल तर मला केव्हाही, या पर्वतांचा येथील साध्या जीवनाचा ओढा, अधिक आहे."

डोळ्याच्या फटीतून त्यानं सतीकडे पाहिले. पण

ती स्तब्ध बसली होती. रिकामे हात मांडीवर तसेच पडून होते. तिला डोळ्यांनी बघताच येत नव्हतं. ओठाची थरथर थांबवण्यासाठी ती तो चावत होती.

सतीची ही अवस्था पाहून नारदाला तिची शंका आली. 'आपण फार बडबडलो की काय? आपली अनावर जीभ आपल्याबरोबर भरकटली की काय?' त्यानं सुस्कारा टाकला. 'मला कुणाला दुखवायचं नव्हतं. पण माझी ती जीभ! तिला जणू तिचं वेगळंच अस्तित्व आहे? लोक म्हणतात की हा जातो तिथे कळ लावतो. पण मी नाही खोड काढीत – खरंच नाही. ही जीभच सारं करते' नारदाच्या मनात विचारांचं काहूर माजलं. वीणा नि चिपळ्या घेऊन तो उठला, दाराशी गेला नि बाहेर पडला.

सती होती तशीच निश्चल बसून राहिली. आपल्याच तंद्रीत. तिला नारद गेल्याचं कळलंही नाही. शिवच त्याला पोचवायला घरापर्यंत गेला. तो गेल्यावर त्यानं दार बंद केलं. पण सतीचं मन फार दूर घोटाळत होतं. नारदाचं संगीत, त्याचे सूर नि शब्द अजून तिच्या कानात निनादत होते.

"चल. आपण सारीपाट खेळू या." तिचं लक्ष ओढून घेण्यासाठी शिवाने सुचवलं. त्यानं पट मांडला. सोंगट्या काढल्या. पण सतीचं मन खेळात

रमेना. काही वेळानं तिने सोंगट्या दूर सारल्या आणि फिरून तिला तंद्री लागली.

"काय झालं तरी काय तुला?" शिवानं तिला विचारलं. तो नारदाची भेट विसरूनही गेला होता.

"मला यज्ञाला जायचंय."

"पण, लाडके, आपल्याला बोलावणं नाही."

"नसू दे! मुलीला बापाच्या घरचं बोलावणं लागत नाही."

शिव तिच्याजवळ बसला. तिच्या हनुवटीला हात लावून अत्यंत प्रेमानं नि हळुवारपणं त्यानं तिचं तोंड आपल्याकडे वळवलं. शिव तिला समजावू लागला. "मुलीला बोलावणं लागत नाही हे अगदी खरं आहे ग. पण केव्हा? जर मुलीवर वडिलांच प्रेम असलं नि तिनं वडिलांना पसंत असलेल्याशी लग्न केलं असलं तर. आणि त्यांना ती यावीशी वाटली तर." त्याचा चेहरा फार गंभीर झाला. पण त्याचे डोळे मात्र मृदू भावनेने तिच्या डोळ्यात निरखून बघत होते.

"सती, चूक करू नको. तुझ्या वडिलांना मी आवडत नाही. ते माझा द्वेष करतात नि तू माझी बायको आहेस म्हणून दक्षाच्या घरात तुझं स्वागत होणार नाही."

"बाबांना पूर्वी तुम्ही आवडत नव्हता. ते तुमचा द्वेष करीत. पण त्याला किती तरी वर्ष झालीत. बराच काळ लोटला आहे. आणि बाबा बदलले असतील."

शिव हसला, "दक्ष बदलणार?" सती तू किती ग भोळी! अजून मुलासारखीच अजाण आहेस. दक्ष कधी बदलायचा नाही. आणि तो बदलणं शक्य नाही, हे तुला कसं कळत नाही. कुठल्याही बदलाशी त्याचं वैर आहे. तो प्रतिष्ठित देवांपैकी . . ."

शिवाला सतीनं अडवलं. "तुम्ही काय बोलता तेच मला कळत नाही."

रात्री सतीला धड झोप लागली नाही. "इथं किती एकटं एकटं वाटतं. बोलायलासुद्धा कुणी नाही." हाच विचार तिच्या मनात घोळू लागला. सकाळी ती गप्प होती. मनानं ती एकटी नि दूर होती. आपली समाधी सोडून शिव मधून मधून उठून यायचा. तिला समजावून लाडाकोडानं खूष करू पाहायचा. पण ती, ती फक्त आपली दक्षाच्या यज्ञाला जायची इच्छा आहे एवढंच बोलायची.

शिव तिला विनवण्या करत होता. "सती, जरा नीट विचार कर. आता तुझा नि दक्षाच्या दुनियेचा संबंध राहिलेला नाही. तू तिथं गेलीस तर काय प्रसंग ओढवेल कुणास ठाऊक?"

डोकं हलवीत सती हटवादीपणे उत्तरली. "तुम्हाला लेकीचं मन कसं असतं ते माहीत आहे का? तुम्हाला आईबाप पण नाहीत तेव्हा बापाचं काळीज कसं असतं ते तुम्हाला कसं कळणार?"

आता शिवाला राग आला. "मी तुझा पती आहे. आणि पती म्हणून तू माझी आज्ञा मानलीच पाहिजेस. तू यज्ञाला जायचं नाहीस. मी तुला जाऊ देणार नाही. तुला रोखीन."

सतीनं वर पाहिलं. तिच्या डोळ्यातून ठिणग्या उडत होत्या. अगदी खालच्या पण निश्चयी स्वरात ती म्हणाली, "जाऊ देणार नाही. जाऊ देणार नाही असं तुम्ही म्हटलंत? मला म्हटलंत? मी जगन्माता आहे. मला रोखण्याची भाषा तुम्ही करता? मला अडवता? तुम्ही कुणाला रोखत आहात ते मी तुम्हाला बरोबर दाखवून देईन."

सती उठली. शिव बघत राहिला. बघता बघता ती फुगत चालली. ती इतकी फुगली वाढली की सारे विश्व व्यापून देखील ती उरली. तिच्या डोळ्यात नक्षत्रं फिरताना त्याला दिसली. तिच्या केसांत चांदण्या चमकत होत्या. तिच्या प्रचंड तोंडात भूत, वर्तमान नि भविष्य एकत्र झालेले त्याला दिसले.

शिव थरथरू लागला. मोठ्यानं ओरडला. त्याबरोबर दृश्य पालटलं. मग त्याला ती कुमारीच्या मोहक स्वरूपात दिसली. कन्याकुमारी त्यानं आपला अनुयय करावा म्हणून आसुसली होती.

पण जेव्हा शिव तिला स्पर्श करायला निघाला तेव्हा ती कन्याकुमारी राहिली नाही. ती शीतला झाली. देवीच्या रोगाची भयंकर देवता. ती गल्लीबोळातून हिंडत होती. त्याच गल्ल्यात उंदरांच्या झुंडी खरकट्यावर, शिळ्या घाणेरड्या अन्नावर तुटून पडत होते. शिवाला तिची अत्यंत घृणा आली.

तेवढ्यात शीतला गेली नि गौरी आली. गौरी ही भूमाता. अत्यंत ममताळू. भूमीचं पोषण करून तिला ती सुफळ करायची. तिच्या आज्ञेमुळेच शेतं हिरवीगार व्हायची नि रानफुलं फुलायची. अशी ती सौम्य गौरी!

बघता बघता गौरीचा चेहरा बदलला आणि अक्राळ विक्राळ काली भयंकर आरोळ्या फोडत शिवासमोर ठाकली. तिचा चेहरा काळा होता. जीभ लाली लाल! काली पिसाटपणे रणभूमीवर नाचत होती. माणसाचं उष्ण रक्त आणि मांस यांचा बळी हवा म्हणून गर्जत होती.

शिवाच्या सभोवती आकाश फिरू लागलं आणि समोरचा देखावा बदलला. सिंहावर बसलेली दुर्गा

आपली युद्धातली शस्त्र गरगरा फिरवताना त्याला दिसली. दुर्गा गेली आणि तिच्या जागी आकाशाची व पर्वतांची देवता त्रिपुरसुंदरी अवतरली.

सतीची अशी हजारो रूपं शिवानं पाहिली नि तो भयभीत झाला. ''मला क्षमा कर'' त्यानं आर्जवलं. त्याबरोबर सतीनं पुन्हा आपलं मूळरूप धारण केलं. ती सौम्य, मोहक नि गोड बोलणारी सती. त्याची पत्नी, त्याची प्रेयसी. ''प्रियतमा मला जायला परवानगी द्या '' असं तिनं त्याला विनवलं.'' तिच्या डोळ्यातून आसवं ओघळत होती. आवाज अगदी सौम्य झाला होता. शिवाला 'नाही' म्हणवेना. तो मवाळला.

''जायचंच तर जा'' असं म्हणून त्यानं उसासा टाकला. त्याबरोबर तिचे डोळे चमचमले. पण शिव चिंतेनं व्याकुळ होऊन म्हणाला,''लाडके, तुझी मला फार काळजी वाटते.''

''जे व्हायचं ते झालंच पाहिजे. दैवगतीला कोण ओळखू शकला आहे?'' सतीनं गंभीरपणे उत्तर दिलं.

शिवानं मान हलवली. तिनं जाऊ नये असं त्याला मनापासून वाटत होतं. पण तिचं म्हणणंही एकापरीने खरंच होतं. सतीला तर जायची इतकी घाई झाली होती की विचारायची सोय नाही.

नंदीला बरोबर घेऊन ती डोंगर उतरू लागली. ती इतक्या आनंदाने चालली होती की जशी काही हवेतच तरंगत आहे. शिव सावकाश मागे फिरला आणि आपल्या घरी येऊन समाधी लावून बसला. सती यज्ञ होता त्या ठिकाणाजवळ पोहोचली. दक्षाची यज्ञशाळा लोकांनी खच्चून भरली होती. प्रत्येकजण आपापल्या जागी बसला होता. प्रत्येकाच्या तोंडावर आपल्या मोठेपणाचा गंभीर भाव पसरलेला सतीला दिसला. प्रत्येकाची जागा त्याच्या मोठेपणाला नि प्रतिष्ठेला अनुसरूनच मुक्रर केलेली होती.

सतीनं आपल्या बहिणींना नि मेहुण्यांना ओळखलं. ती सारीजणं मौल्यवान दागिने नि उंची वस्त्रं नेसून सजले होते. त्यांचे रंगवलेले चेहरे मुखवट्यासारखे दिसत होते. पण ते मुखवटे मोठे सुरेख होते. कदाचित सतीचं हृदय प्रेमाने भरून गेल्यामुळे तिला तसं वाटत असावं.

तिची नजर त्याच्या पलीकडे गेली. यज्ञशाळेच्या मध्यभागी पेटलेल्या भव्य यज्ञकुंडाजवळ तिचा पिता अग्नीत आहुती टाकत होता. ती जरासं हसली. दक्ष आपल्या गंभीर आवाजात वेदमंत्र म्हणत होता. त्याच्यामागून हजारो पुरोहित तो एकत्र म्हणत होते. त्यांच्यासभोवार सोन्या-चांदीची पात्रं, सूर्य, चंद्र

ताऱ्यांसारखी चमकत होती.

जाडभरडं वस्त्रं नेसलेल्या अलंकारहीन सतीनं यज्ञशाळेत प्रवेश केला. अत्यानंदानं आपले दोन्ही बाहू पसरून, आसनावर बसलेल्या प्रतिष्ठिताना वळसा घालून ती धावतच यज्ञकुंडाजवळ गेली.

पण जमलेल्या पाहुण्यांची चुळबुळ सुरू झाली. चेहरे आपल्याकडेच वळलेले सतीला दिसले. त्यांच्या कोरीव भुवया वर चढल्या. त्यांच्या तोंडावर आश्चर्य, नि रंगवलेल्या ओठांवर तुच्छतेचं हसू उमटलेलं तिला दिसलं. त्यांच्या पापण्या फडफडल्या. डोळे फाडफाडून सारेजण आपल्याकडे बघताना तिला दिसले.

आपल्या बहिणी एकमेकींना काहीतरी कोपरखळी मारताहेत हे तिनं पाहिलं नि त्यांनी केलेली कुचेष्टाही कानांनी ऐकली. पण त्या कुचेष्टेचं कारण आपणच आहोत हे मात्र त्यावेळी तिला उमगलं नाही. आपली जाडीभरडी पिवळी साडी नि केसात खोचलेली रानफुलं ही त्यांच्या कुत्सित टाकेचा विषय आहे हे तिला समजलंच नाही.

एव्हाना सती यज्ञाच्या वेदीपर्यंत पोहोचली होती. तिथं बसलेल्या आपल्या आईबापांना तिनं नमस्कार केला. तिचे हृदय प्रेमाने ओसंडून चाललं होतं. "माझे बाबा! माझी आई!" असं ती पुटपुटली.

दक्षानं वळून पाहिलं. रागान त्याचे डोळे विस्फारले. त्याचा चेहरा आक्रसला. त्यानं जोरात श्वास घेतला, तो तिनं ऐकला. दातओठ खात तो म्हणाला, "निर्लज्ज, सटवे! इथं पुन्हा यायला तू धजलीस? मी शाप देऊन तुला घराबाहेर घालवून दिलं तरी तू आलीस?"

सतीचा चेहरा पांढरा फटक पडला. पण ती खचली नाही. हटली नाही. "बाबा, अपत्याबद्दलचं प्रेम पित्याच्या शापाला ही आशिर्वाद बनवतं." तिचं हे बोलणं अगदी स्पष्ट होते. बोलताना तिचा स्वर सौम्य होता. तिचा आवाज मृदू होता तरी तो साऱ्यांच्या कानी पडला. "सांगा बाबा, नाहीतर कुणीही स्त्री ज्या सर्वात श्रेष्ठ पतिसुखाची हेवा करील इतका उदात्त, चांगला आणि शिवासारखा प्रेमळ पती मिळयाचं सुख मला कसं मिळतं?"

"त्याचं नाव माझ्यासमोर घेऊ नकोस." दक्ष संतापानं लाल झाला होता. त्याच्या कपाळावरच्या शिरा फुगून ताडताड उडू लागल्या. त्यानं मोठमोठ्याने शिवाला शिव्यांची लाखोली वहायला सुरुवात केली. त्याचा आवाज चढत चालला. त्याच्या मनात जो द्वेष खदखदत होता तो आता शिवराळ शब्दांच्या लोंढ्यांच्या रूपाने बाहेर पडू लागला.

"थांबा! बाबा. थांबा" ते अपशब्द सहन न होऊन सतीने दोन्ही कान हातांनी झाकले. तिने घोर निराशेने यज्ञशाळेत सर्वत्र नजर फिरवली. पण तिथल्या साऱ्या डोळ्यात तिरस्काराविषयी तिला काही आढळलं नाही. प्रसूतीनं ही मान वळवल्याचं तिनं पाहिलं. दक्ष भडाभडा शिव्या देऊन शिवाचा अपमान करीतच होता.

सती उठून उभी राहिली. तीव्र स्वरात ती बोलू लागली, "बाबा, तुम्ही बोलताहात ते सारं अज्ञानापायी बोलताहात आणि आता मला कळून चुकलं आहे की शिवाचा जो घोर पाणउतारा तुम्ही इथं केला आहे त्याचं प्रायश्चित मलाच घ्यावं लागणार आहे." बोलतबोलत ती यज्ञाच्या अग्नीजवळ गेली. शेवटला शब्द संपतो तोच तिनं स्वतःला त्या लसलसत्या ज्वाळात झोकून दिलं.

यज्ञशाळेत साऱ्यांच्या अंगात कापरं भरलं. क्षणभर त्या स्तंभित सभेत नीरव शांतता पसरली. "तिला थोपवा. तिला वाचवा. तिला धरा" अशा आरोळ्यांनी ती शांतता भंगली, पण तोवर वेळ टळली होती.

आपल्या मुलीला ज्वाळांनी घेरले आहे हे पाहून दक्ष भयभीत झाला. प्रसूती हुंदके देत म्हणाली,

"माझ्या बाळे, हे तू काय केलंस ग चिमणे!"

सारे यज्ञविधी समारंभ बंद झाले आणि सारे भेदरलेले लोक यज्ञाभोवती जमा झाले. पुरोहित थरथर कापू लागले. त्यांची वाचाच बसली.

तेवढ्यात सर्वजणांच्या समक्ष नंदी उड्या मारत मारत पुढे आला. रडत रडत तो शिव्याशाप देऊ लागला, आपली शिंग हलवीत तो म्हणाला, "पृथ्वी आणि स्वर्ग तुम्ही साक्षी आहात. अरे अमानुष दक्षा, तुझ्या पापाचं प्रायश्चित्त तुला मिळाल्यावाचून रहाणार नाही. शिवाचं खडग येवो नि तुझं डोकं धडापासून वेगळं करो."

सतीच्या शवासमोर थोडा वेळ उभा राहून नंदी छाती फुटल्यासारखा रडू लागला. ज्वाळांनी सतीच्या शरीरातला प्राण काढून घेतला होता. पण तिच्या लावण्याला त्या स्पर्श करू धजल्या नाहीत. सती जणू झोपलीच होती.

नंदी ओक्साबोक्शी रडत सतीला परत येण्यासाठी विनवू लागला. मग तो परत फिरला आणि पळत सुटला. यज्ञभूमीच्या प्रमुख द्वारापाशी आल्यावर त्याचं पळणं थांबलं नि तो आक्रंदू लागला.

"अरे दक्षा, जर एखादा चमत्कार होऊनच तू जगलास, तुझ्यावर सूड घेतल्यावरही जगलास तर तू

बोकडाचं डोकं नि तोंड घेऊनच जग. म्हणजे लोकाना तू खरा कोण आहेस ते कळेल." नंदी न राहून अत्यंत कर्कश आवाजात ओरडला.

भ्रमिष्टासारखे वागून त्यानं ती शाळा दुमदुमवली आणि ती शापित भूमी त्यानं सोडली. तो कैलासाच्या मार्गाला लागला.

अंगावर चिखलाचे पोपडे चिकटलेला तो नंदी कसाबसा अखेर कैलासाला पोचला. शिवासमोर गेल्यावर रडत रडत त्याच्या पाया पडला. सतीच्या मरणाची सारी कथा त्याने भडाभडा ऐकविली.

शिव ऐकत होता पण नंदीच्या बोलण्याचा अर्थच त्याला प्रथम लागेना. अखेर तो कळला तेव्हा महादेवाच्या कंठातून एक करुण पण भयंकर किंकाळी फुटली. "नाही हे खरं नाही." नंदीला घट्ट बिलगून असे केविलवाणे उद्‌गार त्यानं काढले. "सांग, नंदी हे खरं नाही म्हणून सांग."

कावऱ्याबावऱ्या आणि बेभान नजरेनं शिव भोवताली पाहू लागला. "हे खरं नाही" हेच पालुपद त्यानं चालू ठेवलं. रात्रभर हेच वाक्य तो घोकीत होता. वेळ जाता जाईना.

नंदी हातापायांची जुडी करून गुपचूप रडत, शोक करीत एका कोपऱ्यात बसला. आपल्या मालकावर

एवढं मोठं दुःख कोसळलेलं असताना त्याला एकटंच सोडलेलं बरं असं त्याला वाटलं. दुसऱ्याच्या दुःखाच्या डोहात कुणालाच शिरणं शक्य नसतं.

झुंजूमुंजू झालं तेव्हा पहाटेच्या छाया प्रकाशात शिवाला जाणीव झाली की आपली प्रिय सती आता हे जग सोडून गेली आहे.

त्यानं नंदीला जवळ बोलावले. त्याचा हात आपल्या हातात घेतला. अगदी हलक्या आवाजात तो म्हणाला,"नंदी, फिरून सारं सांग.सारी कथा फिरून घडली तशी सांग. मला सारं काही नीट ऐकलं पाहिजे. पहिल्यापासून अखेरपोतर जे जसं घडलं ते सारं जसंच्या तसं मला पाहता आलं पाहिजे."

त्या म्हाताऱ्या सेवकानं सारी कथा ती जशी घडली तशी सांगितली. त्याला जराही अडथळा न करता शिवानं कान देऊन सारं काही ऐकून घेतलं. नंदीनं तो भयंकर शेवट सांगितल्यावर शिव पुन्हा म्हणाला, "नंदी फिरून सर्व सांग. प्रत्येक तपशील बारकाईने सांग. काही वगळू नकोस."

अखेर कैलासनाथ शिव उठून उभा राहिला. त्याचा चेहरा त्याच्या अंगाला फासलेल्या भस्मासारखाच पांढरा फटक पडला होता. दुःख-संतापाने विकट झाला होता. त्याचे डोळे पेटत्या

निखाऱ्यांसारखे लालबुंद झाले होते.

आपल्या घनदाट जटातून हात फिरवून त्यानं चिमटीनं एक केस ओढून काढला आणि तो नंदीसमोर धरला. तो केस त्या महादेवाच्या हातात जणू सजीव झाल्यासारखा वळवळू लागला.

शिवानं तो हलकेच खाली टाकला. त्याच्या बोटातून सुटून तो केस हवेत तरंगू लागला तेव्हा आकाशात धूमकेतू गर्जत सुटले. ग्रह एकमेकांवर आदळताना मोठा थोरला भयंकर आवाज झाला आणि पृथ्वीला स्पर्श करताना शिवाच्या जटेचा तो केस उभा चिरला गेला.

पृथ्वीवर, पर्वतांची शकलं शकलं होऊन ते खाली कोसळले. ज्वालामुखी पेटले. त्यांची आग आकाशाला भिडली. तिनं सूर्याला झाकून टाकलं.

नंतर या साऱ्या ज्वाळा एकवटल्या आणि त्यातून एका जिवंत, जळत्या प्राण्याची आकृती बाहेर पडली. या प्राण्याचा चेहरा लांबडा लाल होता. त्याला पुष्कळ हात होते. त्याच्या रामरोमातून ज्वाळा निघत होत्या. हा अक्राळ विक्राळ प्राणी पाहून मूर्तिमंत संहार पाहिल्यासारखा थरथर कापत नंदी गुडघे टेकून बसला. शिवाच्या प्रचंड क्रोधाचं मूर्तिमंत प्रतिक असा हा वीरभद्र देव आहे हे त्यानं ओळखलं. दक्षाची

घटका भरली आहे असे त्याला वाटले.

आत्यंतिक भयानं नंदी डोळे गरगर फिरवीत बघत होता. त्या भयानक वीरभद्राभोवती ज्वालामुखीच्या ज्वाळांचे लोट उठत होते. त्यातील प्रत्येक ज्वाळा, प्रत्येक ठिणगी एकेका गणाला, राक्षसाला नि भुताला निर्माण करीत होती. ही सारी भुतावळ आकाराने वीरभद्राहून लहान असली तरी प्रत्येकजण दिसायला त्याच्यासारखाच भयंकर होता.

हजारोंच्या संख्येने असणारी ती भुते नाचू लागली. अक्राळ विक्राळ ओरडू लागली. शिव्याशाप देऊ लागला. त्यांचे नाच विकट होते. गाणी भयाण होती. त्यात द्वेषच द्वेष भरला होता. 'रक्त हवं. मरण हवं, सूड हवा' अशा त्यांच्या आरोळ्या होत्या. त्यांच्या हातात चाकू, तरवारी, चक्र, कुऱ्हाडी, शिळा आणि झाडाच्या फांद्या अशी शस्त्रं होती. क्षणोक्षणी त्यांची संख्या वाढतच होती.

त्या गणांची किंवा विक्राळ भुतांची संख्या आता गणतीबाहेर गेली. शिवाच्या जटेच्या केसातून हे सारे गण निर्माण झाले होते तरी शिव मात्र एकटाच शून्य नजर दूरवर लावून बसला होता. त्याला काही दिसत नव्हतं, काही ऐकू येत नव्हतं. गणांचं नाचणं, रक्त गोठवणाऱ्या त्या त्यांच्या आरोळ्या त्याला ऐकू येत

नव्हत्या. त्यांचे भयानक चेहरे त्याला दिसत नव्हते. त्याला कशाचंच भान नव्हते. तो साऱ्यांच्या पलीकडे गेला होता. आपण आपला विनाशी केस खाली टाकून दिला याचंही स्मरण त्याला नव्हतं. तो आपल्या दुःखात बुडाला होता. दुःखाच्या लाटाच लाटा त्याच्या मस्तकाला वेढीत होत्या. त्याच्यापुरते फक्त स्वतःचं अनंत अपरंपार दुःख शिल्लक राहिलं होतं.

घरातून बाहेर पडला तरी शिव मूढच झाल्यासारखा होता. त्याची सती ज्या वाटेनं गेली त्याच वाटेनं तो दक्षाच्या यज्ञशाळेच्या रोखानं जाऊ लागला. त्याचा चेहरा आक्रसला होता, काळवंडला होता, त्याच्या डोळ्यातला अंगार विझून मरुन गेला होता. त्याच्या दुखऱ्या अंतःकरणातून एकच आर्त साद येत होती. "सती! मी येतोय. तुझ्याकडेच येतोय!"

शिवानं कोसच्याकोस अंतर पायी तुडविले. नंतर तो दक्षाची दुनिया होती तिथं आला. नंदी त्याच्याबरोबर धावत होता. त्याला धाप लागली होती. वीरभद्राची गणभुतांची सेना त्याच्या सभोवार चालली होती. त्यांचे लाल, पिवळे झेंडे दुपारच्या उन्हात पेटून उठल्यासारखे दिसत होते. "सूड, सूड"

ती पिशाचं ओरडत होती. "रक्त, मृत्यू नि विनाश."

या विचारांसरशी त्यांची चालण्याची गती वाढली आणि ते गण दक्षाच्या प्रासादाशी आले. त्यांनी दरवाजांना धडका दिल्या. प्रासादाच्या भिंतींवरून आत उड्या मारल्या. प्रथम शिव आत आला. त्याच्या मागून वीरभद्र. त्यानंतर ती भुतावळ आत शिरली. भुतावळीनं एकच हल्ला चढवला. त्यानं सगळीकडे एकच गोंधळ माजला.

अत्यंत रानटीपणे मोठमोठ्या आरोळ्या ठोकीत भुतावळीनं आपल्या कामाला सुरूवात केली. सर्वत्र मोडतोड, नासधूस व आग यांचं राज्य सुरू झालं. अगोदरच गर्भगळित झालेल्या लोकांवर ते तुटून पडले. त्यांना त्यांनी काठ्यानी, दांड्यांनी बडवलं. दक्षाच्या पुरोहितांच्या शेंड्या पकडून त्यांनी त्यांना भुईवर लोळवलं. सोन्या-चांदीची चमकणारी भांडी त्यांनी लाथांनी उडवली. धान्य नि लोणी त्यांनी पायाखाली तुडवलं आणि यज्ञातलं पवित्र सोवळं वस्त्र फाडून त्याच्या धांदोट्या केल्या.

देव आणि देवता लपून बसल्या होत्या. भुतावळीनं त्यांना हुडकून काढून गुडघे टेकायला लावलं. यमाचा दंड त्यानी मोडून टाकला. अग्नीचे दात पाडले, इंद्राच्या डोक्यावर चढून ते गण नाचले

नि त्यांनी सरस्वतीचं नाक कापलं. सूर्याचा डोळा त्यांनी उपटला आणि चंद्राला झोडपलं.

आणि पिशाचं हे सारं करीत असताना त्या गणांचा नायक वीरभद्र आपल्या धगधगत्या डोळ्यांनी दक्षाला हुडकीत होता. दक्षाचा शेवट जवळ येऊन ठेपला. जिथं जिथं जिथे दक्ष जाई तिथं वीरभद्राचे डोळे त्याच्या मागोमाग फिरत.

दक्ष धापा टाकीत नि रडत एका मागून एक देवाआड लपून आसरा घेत होता. पण ते सारे देव वीरभद्राच्या बळापुढे कुचकामी ठरत होते. वीरभद्राच्या एका बलिष्ठ हाताच्या फटकाऱ्यानं तीस कोटी देवाना बाजूला उडवून दिलं. सारेच्या सारे देव निष्प्रभ झाले.

अखेर दक्षानं जवळ उभ्या असलेल्या प्रसूतीच्या पाठी आसरा घेतला. पण तोही फार काळ टिकला नाही. वीरभद्राच्या जळजळीत डोळ्यानी त्याला हेरलंच. त्या भयंकर प्राण्याची सावली समोर ठाकलेली पाहून दक्षानं तिच्यासमोर गुडघे टेकले. तो वीरभद्राला दयेची याचना करू लागला.

ते क्रूर पेटते डोळे दक्षाच्या डोळ्यांकडे रोखून बघू लागले. हजार ज्वालामुखींची आग त्यांच्यात भडकलेली होती. त्या नजरेत दया, करुणा यांचा

लवलेशही नव्हता.

वीरभद्राची लखलखीत तलवार हवेत क्षणभर चमकली आणि दक्षाचं मुंडके जमिनीवर पडलं. त्याचं धड पिळवटलं. त्यातून रक्ताचं कारंज उसळून वाहू लागलं. त्याबरोबर त्या पिशाची गणांनी जोरजोरानी भेसूर हसायला सुरूवात केली. दक्ष-प्रजापती मेला.

शिवाला मात्र यातलं काही कळलं नाही. की दिसलं नाही. त्याला फक्त सतीचं चितेवरचं प्रेत तेवढं दिसलं. त्या मृत देहाकडे तो डोळे विस्फारून टक लावून बघतच राहिला. त्याच्या दृष्टीनं बाकी काहीही अस्तित्वातच नव्हतं.

नाही म्हणायला एकदाच काय ते त्याचं मन दुःखाच्या त्या काळयाकुट्ट खाईतून वर आलं होतं. प्रसूतीनं रडत त्याच्या पायांवर लोटांगण घातले. आपल्या नवऱ्याला जीवदान देण्याची याचना केली. त्यावेळी मात्र शिवान मान वळवून तिच्याकडे पाहिलं.

त्या उदात्त, केस पिकलेल्या स्त्रीला त्यानं ओळखलं. त्याच्या डोळ्यात कणव चमकली. त्याला आठवलं की ही सतीची आई आहे. तिनं सतीला पाजलं होतं, वाढवलं होतं. तिच्यावर प्रेम केलं होतं. सती वाढत होती तशी ही तिच्यावर जागती पाखर

घालीत होती. त्याचे ओठ हलले. क्षीण स्वरात पुटपुटल्यासारखे शब्द बाहेर पडले, ''दक्ष जगेल.'' आणि त्यानंतर तो गप्प झाला.

दक्षाचे हात हलू लागले. मानेतून रक्ताचा फवारा उडत असताना त्याचं मस्तकविहीन धड हलू लागलं. प्रसूती किंचाळली. ''जिवंत आहेत. जिते आहेत.'' इतक्यात दक्षाचं धड उठून उभं राहिलं. त्याचे हात अधांतरी काहीतरी शोधत चाचपडू लागले.

प्रसूती पांढरीफटक पडली. हातांनी आपले डोळे तिन झाकून घेतले. भिती आणि चिंतेनं तिला उभं चिरलं. ती जोरात आक्रोश करत होती. ''हाय रे देवा! मस्तकाशिवाय त्याना जगावं लागणार आहे ना!''

फिरून तिनं शिवापुढे गुडघे टेकले. स्फुंदत ती आर्जवत होती. ''शिवा! दया कर. अशा तऱ्हेनं त्यांना जगवू नकोस. त्यांना मस्तकविहीन राक्षस, पिशाच्च बनवू नकोस. याच्यापेक्षा मरण, निखालस मरण परवडलं. दया कर देवा!''

पण शिवानं तिचं बोलणं ऐकलंच नाही. त्याची दृष्टि, त्याची जाणीव आपल्या बायकोच्या मृत देहाकडे खिळून राहिली होती. प्रसूतीचे हुंदके नि विनवण्या त्याच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत.

शिवाची तंद्री लागलेली पाहून गणांनी, पिशाच्चांनी क्रूर थैमान घातले. ते अक्राळ विक्राळ आवाजात ओरडू लागले. बीभत्स गाणी गाऊ लागले. ''दक्षाला मस्तक हवंच'' असा घोष करत ते किंचाळू लागले. ''महान-दक्ष-प्रजापतीला चेहरा हवाच. प्रसूती म्हणाली ना? तर आपण त्याच्यासाठी मुंडकं शोधलंच पाहिजे. मुंडकं हवं, मुंडकं हवंच''अशा आरोळ्या ठोकत पिशाच्चांनी हैदोस घातला.

यज्ञाच्या वेदीजवळ बळी देण्यासाठी एक बकरा बांधला होता. पण साऱ्या धुमश्चक्रीत त्याला बळी द्यायचं राहूनचं गेलं होतं. तो एकाकी बकरा सारखा बें बें करून ओरडत होता.

वीरभद्राची सेना मिळेल त्याचा नाश करीत सुटलीच होती. तेव्हा एका पिशाचानं मोठी आरोळी ठोकली. एका क्षणात त्या बोकडाचं डोकं धडापासून त्यानं वेगळं केलं. आपल्या लखलखणाऱ्या तीक्ष्ण तलवारीच्या टोकावर धरून हलवीत ते पिशाच्च ते विजयचिन्ह साऱ्यांना दाखवीत म्हणाले, ''हेच तोंड नीट बसेल.'' दुसऱ्या एका पिशाचानं हसत हसत ते मुंडकं झेललं आणि म्हणाले, ''दक्षाला हेच ठीक आहे. त्यानं काही फरक पडणार नाही! नाहीतरी त्याचे ते मंत्रोच्चार बकऱ्याच्या खुळ्या 'बें बें'हून काय

वेगळे होते?"

हे ऐकल्यावर त्या भुतावळीतून विकट हास्याचा मोठा ध्वनी निघाला. त्यांनी त्या पिशाच्चाच्या बोलण्याला दुजोरा दिला. बोकडाचं ते मुंडकं या हातातून त्या हातात झेलत झेलत प्रसूती उभी होती तिथवर गेलं. प्रसूती आळोखे पिळोखे देणाऱ्या आपल्या पतीच्या मस्तकविहीत धडाजवळ उभी होती.

पिशाच्चांच्या त्या टोळक्याच्या म्होरक्यानं ते मुंडकं दक्षाच्या मानेच्या खाचेत थापटून थोपटून चपखल बसवलं. लगोलग दक्ष त्या बोकडाच्या भिरभिरत्या डोळ्यांनी पाहू इकडे तिकडे पाहू लागला.

दक्षाचे शब्द बोकडाच्या किनऱ्या आवाजात बाहेर पडू लागले. दानव हो हो करून त्याला शिव्या मोजत हसू लागले. त्यांनी कुचेष्टेने दक्षाला बेजर केलं. त्यांनी त्याला दगड मारून घायाळही केलं. दक्षाचं बोकडाचं डोकं भीतीनं थरथरू लागलं. तो बें बें करून आर्त स्वरानं ओरडू लागला. प्रसूती दक्ष आणि पिशाच्च यांच्या मधोमध उभी राहिली. तिनं दक्षाचा हात हातात घेतला. ती दोघं कशीतरी तिथून निसटली.

शिव मात्र तसाच निश्चल होता. त्याला काही

दिसलं ना काही ऐकू आलं. सतीच्या प्रेताकडे बघत तो किंकर्तव्य मूढ लावून उभा होता. तिच्या मुखावरची त्याची नजर निघेचना. तिच्या मुखावर खिळलेले त्याचे डोळे तिनं फिरून जिवंत होऊन उठावं अशी प्रबळ इच्छा करीत होते.

"सती, ऊठ" अशी हाक ते तिला घालीत होते. पण सती आता सर्व दुःखांच्या नि भावनांच्या पलीकडे गेली होती. ती निपचित पडून राहिली होती. तिच्याकडे बघताना आपण दक्षाच्या वाड्यात, साऱ्या भग्न अवशेषात उभे आहोत हेही शिवाला कळलं नाही.

काही वेळापूर्वी मंत्रघोष, स्तोत्रे, समारंभाच्या ऐश्वर्याने गजबजून गेलली यज्ञशाळा आता केवळ मृत्युभूमी उरली होती. जिथं तिथं रक्ताचे सडे पडले होते. जखमीचं कळवळणं आणि विव्हळणं तसेच त्यांच्या आर्त शोकानं ती जागा भरून गेली होती. यज्ञशाळेतील वस्तूंची इतस्ततः विखुरली होती. सगळीकडे जळका वास सुटला होता. या कशाचंही भान शिवाला नव्हतं.

देवांची नाचक्की झाली होती. तेही शिवाच्या खिजगणतीत नव्हतं. ते सारे शरमिंदे देव आता यज्ञशाळेच्या खांबामागे तोंड लपवून उभे होते. अजून

ते भयानं थरथरत होते. पण शिवाला त्याचं काहीच नव्हतं. तो आपल्या सतीच्या प्रेताकडे भग्न हृदयानं हताशपणे एकटक बघत राहिला होता.

आपण अशा स्थितीत किती वेळ उभे आहोत, शंभर वर्ष की हजार, हेही त्याला कळलं नव्हतं. त्याच्या हृदयात दाटलेला दुःखाचा अनंत महासागर हेलावत होता. प्रत्येक क्षण युगासारखा होता.

अखेर शिव हलला. सतीचं शव त्यानं आपल्या खांद्यावर घेऊन तो चालू लागला. त्या शवाचं प्रचंड ओझं खांद्यावर होतंच पण त्यापेक्षाही जड दुःखाचं ओझं छातीवर घेऊन शिव त्या भग्न, भयानक नि स्मशानकळा आलेल्या त्या यज्ञशाळेतून बाहेर पडला. लोक मुकाट्यानं त्याच्या मागोमाग बाहेर पडले. पण शिव लांब लांब पावलं टाकीत इतका झपाझप चालला होता की त्याच्यामागून चालणंही साऱ्यांना मुष्किल झालं.

शिवाच्या या अवस्थेत सारी सृष्टी क्षुब्ध होऊन उठली. शिवाच्या डोळ्यातून आगीचे लोळ येत होते. त्याच्या जळत्या पावलानी नदी नाले आटून गेले. इंद्र पाऊस पाडत होता पण तोही अंतरिक्षात मधल्यामधेच आटत होता. तृणं, धान्यं, तरू, वेली सारं काही करपून गेलं. जीव जनावरं नि अर्भकं

आजारी होऊन मृत्युपंथाला लागली. पण शिवाला त्याचं काहीच नव्हतं. त्याच्या शरीराचा कण नि कण सतीच्या मरणाच्या दुःखाने ग्रासला होता.

आता मर्त्य माणसाना विचार पडला की आपण करावं तरी काय? आणि मर्त्य माणसांप्रमाणे स्वर्गातले देवदेखील विव्हल झाले. शिवाच्या दुःखानं सारं विश्व भस्म होईल. सारी सृष्टी शून्य होईल या भयानं ते चिंताक्रांत झाले.

आता यावर एकच उपाय होता. समस्त देव-मानव विष्णूकडे धावले. त्यांनी त्याची करुणा भाकली. जगाचा पालनकर्ता विष्णू विश्वाचं रक्षण करायला खाली उतरून शिवाच्या मागोमाग जाऊ लागला. पण शिवाची वाट दुस्तर होती. विनाशाची होती.

विष्णूनं आपल्या भात्यातून एकेक बाण काढून सतीच्या शवावर सोडायला सुरूवात केली. प्रत्येक बाणाबरोबर सतीच्या शरीराचा एकेक भाग खाली गळून पडू लागला. प्रत्येक अवयव ताऱ्यासारखा तेजस्वी होता. हे दृश्य पाहून लोक चकित झाले. सतीचे अवयव तोडणं म्हणजे भलतंच काही विपरीत होतं पण विष्णू ते करीत होता.

सतीच्या मांसाचे तुकडे जिथे पडले त्या प्रत्येक

ठिकाणी एक एक देवळी उभारायला लोकानी सुरूवात केली. सतीची स्मारकं झाली.

बेभान शिव पुढे पुढे चालला होता. त्याच्या पाठीवरलं ओझं हलकं हलकं होत होतं. विष्णू बाण सोडतच होता. विष्णूने बावन्न बाण सोडले. त्याचा बाणाचा भाता रिकामा झाला. सतीचा शेवटचा अवयव खाली पृथ्वीवर पडला आणि विष्णू आला तसा निघून गेला.

आता शिवाला जाग आली. त्याची तंद्री भंगली. सतीच्या शवाचा प्रचंड भार उतरला होता. शिवाला हलकं हलकं वाटू लागलं. पण त्या ओझ्याखाली दडपल्यामुळे त्याचं शरीर थकलं होतं. काही काळापूर्वीच्या भयानक आठवणी अजून दुःस्वप्नासारख्या वर येतच होत्या. तरीदेखील त्याला हलकं वाटू लागलं.

शिव स्वतःशी विचार करू लागला. आपण कुठे होतो नि आता आपण कुठे आहोत? आपलं ओझं कुणी काढून घेतलं? आपण चालत होतो हे त्याला आठवलं. खूप खूप दूर वर चालत आलो हेही त्याला आठवलं. त्यानं आपल्या पायांकडे पाहिलं. त्याची पावलं, पावलं राहिली नव्हती. आता ते ज्यातून रक्त वहात होते असं आकारहीन मांस होतं. पण त्या तशा

पावलांनीही त्याला त्याच्या घराकडे, कैलासाकडे आणून सोडलं होतं.

दक्षाच्या शापित नगरीहून तो आपल्या निवास स्थानाजवळ आला होता. स्तिमित नजरेने त्याने तिथल्या लहान टेकडीकडे पाहिलं. आपलं त्या टेकडीच्या कुशीत विसावलेलं घरकुल पाहिलं. झोकांड्या खात खात त्यानं घराचा उंबरठा ओलांडला. त्याला कळून चुकलं की आता यापुढे इथं आपल्याला विसावा, निवारा असा राहिलेला नाही.

सतीची स्मृती उसळून आली नि शिवाच्या डोळ्यातून आसवांचा महापूर लोटला. आपल्या त्या कुटिरातल्या शांततेनं आणि रितेपणाने त्याच्यावर आघात केला. सतीची भांडीकुंडी, तिच्या आवडीची चीजवस्तू, तो सोंगट्यांचा सारीपट, सुकलेली फुलं सारं काही जमिनीवर जसंच्या तसं पडलं होतं. सतीच्या आवाजात साऱ्या वस्तू जणू त्याच्याशी बोलू लागल्या. नव्हे भेडसावू लागल्या. सतीची हास्याचा खळखळाट, तिची आनंदीवृत्ती, तिचा चांगुलपणा त्याला वाकुल्या दाखवू लागला.

"सती, तू मला सोडून का गेलीस?" शिव मोठ्यांदा ओरडला. त्याच्या आवाजाचा प्रतिध्वनी दऱ्याखोऱ्यांमध्ये घुमला. 'का गेलीस' हे

डोंगर-टेकड्यांनी अनेक वेळा विचारले.

शिवाला आता सारं असहाय्य झालं. तो त्याच्या झोपडीबाहेर पडला, सतीचं नांव घेत, तिचा शोध घेण्याकरता तो इतस्ततः भटकू लागला.

दिवसा-रात्री, प्रत्येक श्वासागणिक शिवाच्या मुखी सतीचंच नाव होतं. तो हे नांव हळूच स्वतःशी घेई आणि मंद वारा त्या मंजुळ नावाचे स्वर चहूबाजूला पसरून देई. वाहत्या पाण्याजवळ बसून त्यानं ते नांव उच्चारलं की ते पाणी ते नाव आपल्याबरोबर घेऊन जाई. आकाशातले ढग आणि धुकं तयाच वातावरणात बुडून गेले होते.

शिवाचं स्वतःचं अस्तित्वच त्या नामात विरघळून गेलं होतं. शिव कैलास शिखरावर बसला तेव्हा सतीचं नामस्मरण हीच त्याची एकमेव प्रार्थना झाली. तीच त्याची अनंत साधना ठरली.

शतकं उलटली, युगं मागे सरली. शिवाभोवती सर्व तारे आणि ग्रह येऊन थांबले. काळ थांबला. विचारचक्र ठप्प झालं. साऱ्या गोष्टी थांबल्या. शिवाचं स्वत्व सतीच्या अनंताशी एकरूप झालं होतं.

उमा

दूर दूर, पर्वतांच्या पलीकडे, शेतांच्या मैदानां-पलीकडे, उचंबळणाऱ्या सागराच्या तळाशी देवांना एक तप करणारी शिवासारखी आकृती दिसली. हे कोण आहे ते बघण्यासाठी देवांनी निरखून पाहिलं तेव्हा त्यांना कळून आलं की तो तारकासुरच आहे.

तारकासुर समाधी लावून हजारो वर्षे बसला होता. त्याच्या ताठरलेल्या शरीराभोवती समुद्रातली जलचरे बागडत होती. त्याच्या जटात बिया रूजून त्यातून वनस्पती वाढू लागल्या.

असुराचं तप म्हणजे देवांना मोठं संकट वाटे. मग ते संकट आज येवो की उद्या. देव समृद्ध होते, बलिष्ठ होते. पण तपस्या करणाऱ्या असुराच्या सामर्थ्याची नि ऐश्वर्याची देवांना कधी बरोबरी करता यायची नाही. तारकासुराला तप करत बसलेला पाहून देवांना अगोदरच धडकी भरली होती. त्यात त्यांनी ब्रह्मदेवाला हंसावर बसून लगबगीने तारकासुराकडे जाताना बघितलं.

हां हां म्हणता हंस पाताळाच्या दिशेने गेला. ब्रह्मदेव पाताळात उतरला. तो तारकासुरावर प्रसन्न झाला होता. देव भयभीत होऊन एकमेकांना बिलगून काय होतं ते बघू लागले. तारकासुराला ब्रह्मदेव काय वर देतो याची उत्सुकता त्यांना लागली कारण तारकासुर मागणार ते भयप्रदच असणार हे देव जाणून होते.

देवांना फार काळ वाट पहावी लागली नाही. त्रिभुवनाला भेदून जाणारा तारकासुराचा आवाज त्यांच्या कानी आला. ब्रह्मदेवाकडे त्याने 'मला मरण यायचं तर ते शिव महादेवाच्या मुलाकडूनच येऊ दे' असा वर मागितला. तो वर ब्रह्मदेवाने त्याला दिला हे त्यांनी स्पष्ट ऐकलं.

त्यानंतर तारकासुराचं भयानक हसणं देवाच्या कानी आलं. ब्रह्मदेवाची तो कीव करत गर्जला. "अरे मूर्खा, ब्रह्मदेवा, हा वर देऊन तू मला अमर केलंस हे कसं तुझ्या लक्षात आलं नाही ? शिव सारखा समाधी लावून बसलेला असतो. त्याचा जगाशी काही संबंध उरलेला नाही. त्याचे विचार सारखे सती भोवतीच फिरत असतात. सती शिवाय त्याला काही सुचतच नाही. सती काही परत यायची नाही. ती दक्षाच्या यज्ञात मरून गेली. आणि पुढे

विष्णूनं आपल्या बाणांनी तिच्या शवाचे बावन्न तुकडे केले ते काही परत जुळवता यायचे नाहीत. तेव्हा शिवाला मुलगा होणारच कसा ? अरे मूर्खा, तुझ्या देवांची सद्दी सरली. त्यांचं वर्चस्व नष्ट झालं."

तो बलाढ्य असुर आपल्या समाधीच्या जागेवरुन उठला. त्याच्या भव्य आकृतीने सातही लोक व्यापले. असुर, पशू, पक्षी आणि सारे प्राणी त्याच्या काबूत आले. साऱ्यांना जिंकून तारकासुर अजिंक्य राहिला. असुरांचं सैन्य बरोबर घेऊन त्याचा रथ स्वर्गाकडे येताना देवांनी पाहिला.

तारकासुराचं सैन्य देवद्वाराशी येऊन ठेपलं. देवांची तारांबळ आणि त्रेधातिरपीट काय वर्णावी ? आपलं सारं सैन्य घेऊन ते तारकासुराशी सामना करायला द्वारात येऊन त्याला अडवू लागले. परंतु तारकासुराचं बळ देवांपेक्षा कितीतरी मोठं पडलं त्यानं देवांना मागे हटवलं. वादळानं पाचोळा उडावा तशी देवांची दाणादाण झाली.

विजयाच्या उन्मादात तारकासुर देवलोकांत आपल्या रथातून गर्वानं मिरवीत गेला. इंद्रलोकात पोहोचल्यावर त्या लोकाची सोन्याची द्वारं त्यानं लाथेनं तोडली आणि इंद्राच्या राज्यात प्रवेश केला. तारकाला अपार हर्ष झाला. त्यानं इंद्राची संपत्ती

लुटायला सुरवात केली. त्याचं भीषण हास्य सर्वत्र दुमदुमलं.

तारकासुराला सर्वात जास्त हर्ष झाला तो उचैःश्रवा हा इंद्राचा घोडा पाहून. उचैःश्रवा देवदानवानी क्षीरसागराचं मंथन केलं त्यातून निघालेलं परम सुंदर नि सुलक्षणी अश्वरत्न होतं. तारकासुरानं त्याची आयाळ धरून त्याला खेचलं. त्यावेळी उचैःश्रव्याच्या भीतीदायक खिंकाळण्याने स्वर्गलोक हादरला.

त्यानंतर तारकानं सारा स्वर्गलोक पालथा घातला. त्यानं कुबेराच्या खजिन्यावर धाड घातली. कुबेराने घाबरून पळ काढला. असुरांनी त्याचा सारा वाडा लुटला. त्याचे हजार सागरी घोडे पळवले.

हे पाहून वायुदेव तारकासुराला हटवायला धावून आला पण तारकानं त्याच्या झिंज्या पकडून त्याला साखळदंडानं बांधून कैदेत टाकलं. त्यानंतर साऱ्या वाऱ्यानी आणि वादळांनी तारकासुरासमोर लोटांगण घातलं. त्याच्या हुकमतीत सारं भयभीत वायुदल राबू लागलं. एवढंच नव्हे तर त्याची जराही गैरमर्जी होत नाही ना याबद्दल वायुदल दक्ष राहू लागलं.

मग काय, तारकासुराचा पराक्रम दर दिवशी वाढू लागला. त्यानं सूर्यदेवावर बाण सोडले आणि त्याचं

सारं तेज काढून घेतलं. चंद्र तर काय ? तारकासुराला बघताच भयाने गोठून जणू काही सोन्याचा जड गोळाच बनून तो जसाच्या तसा उभा राहिला.

चंद्र-सूर्याची ही अवस्था झाल्यावर तारकासुर गर्वानं इतका फुगला की सांगता सोय नाही. देवांना नमवावं, त्यांचा नक्षा उतरवावा ही महत्वाकांक्षा फलद्रूप झाली होती.

देवांची दुर्दशा केल्यावर तारकासुरानं आपला मोर्चा शांत आणि नम्र अशा मुनिजनांकडे वळवला. एका दुर्दैवी दिवशी त्यानं काही तापसांच्या आश्रमांवर घाला घातला. तेथे त्याला त्यांची कामधेनू गाय दिसली. कामधेनू ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला त्याला सोनं, नाणं, वस्त्र प्रावरणं, अन्नधान्य आणि वेळेला सैन्यदेखील पुरवणारी सुलक्षणी गाय होती. वसिष्ठ मुनींच्या आश्रमात ती गाय सुरवातीला रहात होती. त्यांच्या पुण्याईनं तिला आणखी बळ प्राप्त झाले होतं.

देवदुर्लभ असं ते धेनुरत्न पाहिल्यावर तारकासुराला उचैःश्रव अश्वरत्नाप्रमाणेच कामधेनू ही आपल्यालाच मिळाली पाहिजे, अशी वासना झाली नसती तर नवलच.

मदोन्मत्त अशा त्या तारकासुरानं मुनिजनांच्या

त्या कामधेनूला एका अमंगल क्षणी ओढून काढलं. तापसांच्या समक्ष अमंगल वेळेला तो तिला बेदरकारपणे घेऊन चालला. सारे ऋषी तेथे जमले. कामधेनूची शेपटी धरून तो दुष्ट असूर तिला फरफटत नेताना त्या पुण्यवान ऋषींनी पाहिलं.

"तारकासुरा, सावध हो! सावध हो." ते तापस ओरडून म्हणाले. "तू तुझी मर्यादा ओलांडली आहेस. तुझ्या दुष्कर्मांची फळं तुला भोगावी लागतील. ऐक! तुझ्या पापांचा घडा भरत आला आहे. शेवट दूर नाही."

"माझी घटका भरली ? पापाचा घडा भरला ? वा ! वा ! छान" असे त्या ऋषिंनाच उलट विचारत हो हो करून तो हसत सुटला. त्या तापसांकडे एक तुच्छ कटाक्ष टाकून वर अंतराळात उडत फिरून तो म्हणाला, "मला दैवाची भीती वाटत नाही. तुम्हाला माहीत नाही का की ब्रह्मदेवाला ठकवून त्याच्यापासून मी अमरत्वाचा वर मिळवला आहे ? माझा अंत फक्त शिवाच्या मुलाच्या हातून होईल. पण शिवाला मुलगाच कुठे आहे ?"

एवढं बोलून तो तुच्छतेनं एवढ्या जोर जोरात हसत सुटला की सारं ब्रह्मांड त्या हसण्यानं दुमदुमून

गेलं. त्या तापसाना तारकासुराचं लवमात्र भय वाटलं नाही.

तारकासुराने ऋषींना खिजवताना कैलास पर्वताच्या शिखरावर बसलेल्या शिवाकडे बोट दाखवलं. "हा बघा तुमचा शिव महादेव. तो तेथेच कायमचा असा ध्यानस्थ बसून राहील. तो तर आता बर्फाचा पुतळाच बनून गेला आहे. शिवाला सतीचा कधी विसर पडणार नाही. दुसऱ्या स्त्रीकडे तो ढुंकूनदेखील बघणार नाही. तो दुसरं लग्न कधीच करणार नाही. मग तो मुलाचा बाप कसचा होणार ? समजलं ? तर मूर्ख ऋषींनो, ऐका. माझ्या अंताची वाट पाहात तुम्हाला फार काळपर्यंत थांबावं लागेल."

पण आपल्या नशिबाची अमंगल घटका वाटचाल करू लागली आहे हे तारकासुराला कुठलं कळायला ?

शिव सतीच्या पुनःप्राप्तीसाठी समाधी लावून बसला होता. त्याची प्रार्थना फळाला आली. हिमालयात हिमवंत राजाची धाकटी मुलगी म्हणून सती जन्माला आली. मुलीचा जन्मोत्सव हिमवंताच्या राज्यात सर्वत्र थाटाने साजरा झाला.

रंगीत पाळण्यात हातपाय झाडीत तोंडाने

घुसघुस आवाज करणारी ही तान्ही जगज्जननी सती आहे ही गोष्ट फक्त देवांनाच काय ती माहीत होती.

कधी कधी हिमवंताची मोठी मुलगी गंगा मात्र त्या तान्हुलीच्या डोळ्यात निरखून बघायची. जणू काही तिचं जन्मरहस्यच तिला जाणून घ्यायचं होतं. त्या काळयाभोर पाणीदार डोळ्यात गंगेला जे एक अनोखं तेज दिसलं ते इतरांना कधीच दिसलं नाही. गंगेलाच खरं काय ते कळलं. तसा तिनं अंदाज केलाच होता.

मुलीचं नाव उमा ठेवलं गेलं. कधी कधी तिला हिमवती अशीही हाक मारीत. हिमवंताची मुलगी म्हणून हिमवती हे दुसरं नाव पडलं. उमा वाढू लागली. आपल्या बाळलीलांनी साऱ्यांना आनंदीत करू लागली. तिला पाहून आनंदला नाही असा माणूस विरळच होता. उमाला शिवाबद्दल विलक्षण ओढा वाटत होता. ती पूर्वी सती होती व नंतरही सतीच रहायची होती. म्हणूनच तर तिचं शिवावरचं गाढ प्रेम त्याच्याबद्दलची अपरंपार भक्ति तशीच कायम राहिली होती. अर्थात तिला स्वतःला आपण सती आहोत हे काही उमगलं नव्हतं.

यामुळे देवांना हायसं वाटलं. 'आता आपलं रक्षण

होईल. आपल्यावरील संकट जाईल. सती फिरून आली आहे. तिची शिवावर तशीच अचल निष्ठा आहे. आता शिव समाधीतून जागा होईल आणि तिच्या प्रीतीला साद देईल. तो तिच्याशी लग्न करील. तिला मुलगा होईल. तो आपल्याला तारेल.' देव ही संभाव्य घटनांची साखळी जोडून आपापसात एकमेकांना दिलासा देत होते.

देवांनी पाहिलं की ही मुलगी सारे खेळ करते ते शिवाच्या पूजेचे. जागेपणी नि झोपेत तिचे विचार शिवाबद्दलचेच असतात. हे पाहून तिच्या आईबापांना आनंद झाला. ते दक्षासारखे नव्हते. ते शिवाचे परम भक्त होते.

बाळपणी उमा शिवपूजेसाठी फुलं गोळा करायची. मग दूध, पाणी, साखर आणि मध घेऊन शिवमंदिरात जायची. शिवाची पूजा करून त्याला नैवेद्य दाखवायची. या पूजेत गंगाही तिला साथ करायची. आजूबाजूच्या, गावातल्या पोरीही जमत. साऱ्या मुली शिवमूर्तीसमोर नाचायच्या. साऱ्या रात्रभर त्यांच्या गाण्यानी, मृदंगाच्या लयदार नादाने, आणि पैंजणांच्या रुणझुणीने तो सारा भाग घुमून निघायचा. उमेचं असं सुंदर बाळपण भुर्रकन उडून गेलं. उमा मोठी झाली पण नाचणं, गाणं काही थांबलं

नाही.

उमेच्या शिवभक्तीने आनंदित होऊन देव पुढची स्वप्ने पाहू लागले खरे पण ते फार लवकर होते. कारण कुठल्याकुठं दूर कैलासावर बसलेल्या शिवानं तर उमेला पाहिलं नव्हतंच. तिची प्रार्थनाही त्याच्या कानी पडली नव्हती. सतीच्या स्वप्नातच तो बुडून गेलेला होता.

उमा आता चांगलीच मोठी झाली होती. तिच्या सख्याही आता लहान राहिल्या नव्हत्या. त्या जाणत्या झाल्या होता. आईबापांनी निवडलेल्या वराशी लग्न करून एकेकजण सासरी नांदायला गेली होती.

गंगा मोठी विचित्र होती. तिचं सारंच वागणं गूढ होते. कुणाला उमजायचं नाही. तिचा बाणा स्वतंत्र होता. अतिशय स्वच्छंद अशी ती गंगाही दूर एकटीच निघून गेली होती. आपला मार्ग चोखळीत राहिली. देवांनी आणि माणसांनी तिला बरंच समजावलं पण कुणाजवळच ती फार काळ राहिली नाही. आपला स्वतंत्र मार्ग ती आपल्या तऱ्हेने आक्रमत राहिली.

गंगा पित्याचं घर सोडून गेल्यावर हिमवंताच्या घरात उमा एकटीच मुलगी राहिली. तिचे आई-बाप

मुलीला अनुरूप नवरा कसा मिळेल या चिंतेत होते. अनेकदा त्यांची आपापसात या विषयावर बोलणी चालायची. उमा आता वयात आली होती. बरोबरीच्या तिच्या सख्या-सोबतिणींची लग्नं झाली होती. पण उमेला मात्र आपण अजून लग्नाच्या राहिलो आहोत, एकट्याच राहिलो आहोत याची काही म्हटल्या काही खंत वाटत नसे. ती निश्चिंत होती.

एक दिवस हिमवंत राजाने उमेजवळ लग्नाचा विषय काढला. आपली मान हलवित ती अगदी सहजपणे म्हणाली, "बाबा, माझं मन शिवावर बसलं आहे. मी शिवावाचून दुसऱ्या कुणाशीही लग्न करणार नाही."

हिमवंत हे उत्तर ऐकून गडबडला. कैलासाधिपती महेश्वरावर तिची भक्ती आहे हे त्याला चांगलं माहीत होतं. नव्हे, त्या भक्तीला त्यानेच खतपाणी घातलं होतं. पण त्या भक्तीभावाचा शेवट यात होईल असे त्याला अजूनपर्यंत वाटलं नव्हते.

हिमवंत तिची समजूत काढत होता. "ऐक बाळ, मी देखील महादेवाचा उपासक आहे. मलाही कैलासेश्वर शिव अत्यंत प्रिय आहे. पण तुला हे कसं कळत नाही की शिव हा देव आहे? तो अमर आहे,

अप्राप्य आहे. समज, आपण शिव रहातो त्या दुर्गम पर्वत शिखरावर कसेबसे चढून गेलो तरी त्याच्या गाढ समाधीतून त्याला जागा करणं दुरापास्तच आहे. उमे, पोरी तुला तोच हवा म्हणून तो तुला मिळवून देण मला शक्य असतं तर मी केलंच असतं."

प्रेमभराने हिमवंत बोलत होता. "पण शिव हा आपल्यासारखा सामान्य मर्त्याच्या हाती लागण्या पलीकडचा आहे, हे नाही का तुला कळत ? उमे, शिवाची आराधना तू दूर राहूनच कर. पण लग्न करायचं तर एखाद्या मर्त्य मानवाशीच कर. एवढंच मला तुला सांगायचं आहे."

पण उमेचं उत्तर एकच होतं. "माझं मन, माझं हृदय मी शिवाला अर्पण केलंय. जर मला शिवाची प्राप्ती झाली नाही तर मी अन्य कुणालाच वरणार नाही."

हिमवंतानं तिची मनधरणी केली. नाना शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या. पण सर्व पालथ्या घड्यावर पाणी होते. अखेर बिचारा "जे व्हायचं असेल ते होईल. नशिबांपुढे कुणाचं चालतं ?" म्हणून स्वस्थ बसला.

इकडे त्रैलोक्य जिंकून तारकासुर फिरून पाताळलोकात गेला तेव्हा देवांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्यांना हायसं वाटलं. त्या दैत्याचे "शिवाला मुलगा होईल तेव्हा ना' हे शब्द अजून वातावरणात घुमत होते.

देव आता आपसात कुजबुजू लागले. त्यांची नजर शिवाकडे वळली. महादेवाकडे उत्सुक नजरेनं पाहून ते त्याला जोराजोरात विनवून हाका मारु लागले. पण व्यर्थ. कैलासावर समाधी लावून ध्यानस्थ बसलेला महादेव जराही हलला नाही. त्याला काही दिसत नव्हतं नि ऐकू पण येत नव्हतं. तो सतीच्या स्मरणातच मग्न होऊन निश्चल बसला होता. समग्र विश्व जरी त्याच्या भोवती कडाडून पडलं असतं तरी तेही त्याला कळलं नसतं. मग त्याच्याबद्दल काही वाटणं तर सोडाच.

देवांना काही सुचेना. "आता करावं तरी काय ? महादेवाला कशाचीच शुद्ध नाही. याच्या समाधीतून याला जाग कशाने आणावी तरी ?" ते हात चोळीत म्हणाले.

तेवढ्यात ब्रह्मदेवानं सुचविले. "बाबांनो, त्याला नुसती जाग येऊन काय उपयोग ? त्याचं हृदय रमणीच्या प्रेमाने चंचल झालं पाहिजे. उचंबळून आलं

पाहिजे. त्याच्या समाधीचा भंग झाला पाहिजे."

"ते कसं होणार ?" देवांनी शंका काढली.

"थांबा, मी यातून मार्ग काढतो" असं म्हणून ब्रह्मदेवानं डोळे बंद केले. एका मागून एक स्वप्न तो ध्यानावस्थेत पाहू लागला. आणि काय नवल ? देवाच्या अवती भवती पाऊस रिमझिम करीत पडू लागला. मंद वाऱ्याच्या झुळुकाना झाडांची पानं डुलू लागली. देवांना सारं वातावरणच फार प्रसन्न झाल्यासारखं वाटू लागलं. पानांची सळसळ सुरु झाली. गवताची पाती हलूडोलू लागली.

देवांना एक नवयुवा त्या गवतावरून चालून येत असताना दिसला. गवतानीच बाजूला होऊन त्याला वाट करून दिली. तो सुंदर सडसडीत बांध्याचा तरुण अतिशय मोहक होता. देव चकित होऊन पाहू लागले. पिवळं, सुंदर, हलकं वस्त्र नेसलेला तो तरुण दोन पावलं टाकून पुढे आला. आता देवांनी त्याला ओळखलं. "अरे, हा तर वसंत. ऋतूंचा राजा वसंत."

तो चालू लागला तसे हवेत चैतन्य आलं. पक्षी गाऊ लागले. भुंग्यांचा गुंजारव सुरु झाला. भुईतून झरे वर आले. खडकातून, कपारीतून वळसे घेत, शंख, शिंपले नि लहान गोटे याना खुळखुळावीत ते नाचत खेळत वाट काढू लागले. पृथ्वी आनंदली.

झाडांनी कळ्या धरल्या. कळयांची फुलं झाली.

देव अजून बघतच होते. त्यांच्या भोवती हिरव्या परवांचा एक ढग होता. पोपटांचे हिरवे कळप झाडांच्या फांद्या फांद्यातून चिरचिर करत होते; ते नंतर सरळ देवांभोवती घिरट्या घालीत सुटले. मग मोठा हास्याचा ध्वनी हवेत उमटला आणि काय नवल ! कामदेव आणि त्याची पत्नी रती साक्षात् देवांच्यासमोर प्रगटली.

ब्रह्मदेवासमोर वसंत, मदन आणि रती हात जोडून उभी राहिली. "देवा, आम्हाला का बोलवलं ?" नम्रपणे त्यांनी विचारलं. ब्रह्मदेवानं कैलासाच्या सुळक्याकडे बोट दाखवलं. त्या तिघांनी निरखून पाहिलं तर तेथे एक बारीकसा ठिपका त्यांना दिसला.

कामानं काहीशा उद्धट व उथळपणे हसत इक्षुदंडाचं धनुष्य सरसावीत विचारलं, "काय त्याचं हृदय बाणाने विधायचं आहे का ?"

रतीनं आपला सुकुमार देह लचकावीत उसासा टाकला. "आता त्या बिचाऱ्या तापसाचा सर्वनाश जवळ आलाच. ... त्याला बिचाऱ्याला काय माहीत...?" असे पुटपुटत ती आपल्या पतीला बिलगली. आपल्या तरुण पतीच्या सुंदर चेहऱ्याकडे

ती अभिमानानं पाहू लागली.

वसंताचे डोळे आनंदाने चमकले. "आता काही निराळीच गंमत." पण त्याचं वाक्य पुरं व्हायच्या आत सारे ढग नाहीसे झाले. धुकं विरलं आणि त्या तिघांना त्या तापसाच्या जटाजुटेत अडकलेली तेजस्वी चंद्रकोर दिसली. ती पाहून ते तिघेही वरमले. काहीशा अस्वस्थपणे ते एकमेकांकडे बघू लागले. ओढलेल्या आवाजात ते बोलले . "महादेवाला भडकवलं नि तो संतापला तर आपली धडगत नाही."

ते तिघेही हळूच माघार घेऊ लागले तेव्हा देवांनी हात जोडीत काकुळतीला येऊन त्यांना विनविलं. "आमची सारी मदार तुमच्यावर आहे." मग तारकासुराची गोष्ट सांगून ते म्हणाले, "आमची निराशा करू नका."

त्याबरोबर कामदेवानं आपल्या पुष्पबाणावरून हात फिरवला. "छे! मला मुळीच भिती वाटत नाही. मी माझा बाण सोडून शिवाचं काळीज विंधून टाकतो नि त्याची समाधी मोडतो. शिवाला प्रीतिची हतबलता काय असते ते दाखवून देतो. तो शरण आलाच पाहिजे."

मग कामदेव वसंताला म्हणाला. "तू पुढे हो!

माझ्यासाठी मार्ग तयार कर. सारी वनराजी पक्ष्यांच्या मंजुळ गाण्यांनी दुमदुमून जाऊ दे. प्रणयाच्या धुंद नादाच्या पशुपक्ष्यांच्या सादीनी रानंवनं कोंदून जाऊ दे. फुलांचे प्याले सोनेरी मधाने नि परागानी भरून टाक. एवढं झालं की मी माझा पुष्पबाण टाकून कैलासनाथाला जागं करतो." एवढं बोलून काम हसत सुटला. थोड्या वेळानं कामदेवाला काहीतरी आठवल्यासारखं झालं. "त्या मोक्याच्या क्षणी, त्या ठिकाणी, शिवासमोर एक स्त्री हवी " गंभीर होऊन तो उद्‌गारला, "स्त्री हवी एवढंच नाही. तर ती अत्यंत सुंदर असली पाहिजे. शिवासाठी अशी कुणी स्त्री तुम्ही हेरली आहे ?"

"होय होय हेरली आहे " देव उत्तरले. "आम्ही या गोष्टीचा आधीच विचार केलेला आहे. तू म्हणतोस तशी सुंदर कामिनी आहे. तिचं नाव उमा. कामदेवा तू भिऊ नकोस. शिव समाधी लावून बसलेल्या ठिकाणी आम्ही उमेला आणून सोडू."

मग कामदेवालाही स्फुरण चढले. तो आनंदानं हसला. "मग संशय कसला नि काळजी तरी कसली? आता कामालाच लागलं पाहिजे. वसंता, तू पुढे हो. साऱ्या पृथ्वीला सजव."

"सजवीनच" इतकं बोलून वसंत डोंगरदऱ्यातून

वेगाने चालू लागलासुद्धा. जेथे जेथे त्याचं पाऊल पडे तेथे तेथे धरणीतून सुगंधी फुलं वर येऊ लागली. सारा वनभाग सुशोभित झाला. जेथे रतीचं पाऊल पडे तेथे प्राणिमात्रांच्या हृदयात वासनांचं स्पंदन सुरु होई. त्या दोघांच्या मागून कामदेव आपलं धनुष्य घेऊन जात होता. त्याचे बाण फुलांचे होते. या बाणांच्या भात्यावर भुंगे घोंगावत होते.

उमा झुंजूमुंजूलाच जागी झाली. घरातली इतर सारीजणं झोपलेलीच होती. तिनं खिडकीतून पाहिलं तर आकाशात काही चांदण्या लुकलुकत होत्या. क्षितिजाच्या दूरच्या कडेला हिमशुभ्र कैलासाचं शिखर साऱ्या काळ्या सावल्यांवरती डोक वर काढून दिमाखानं उभं असलेलं तिला दिसलं. त्या उंच शिखरावर सूर्याचे किरण पडले होते.

सकाळ वर आली होती. उमा उठली आणि प्रासादाच्या दारातून बाहेर धावत सुटली. समोरचे पर्वत जणू तिला साद घालीत होते. गावाच्या अरूंद बोळांतून वाकड्या तिकड्या गल्ल्यातून उमा वेगाने पळत सुटली. गांव मागे पडलं. उमा खुल्या कुरणात येऊन पोहोचली. आजूबाजूला सर्वत्र बर्फ होतं. झाड

निष्पर्ण उघडीशी उभी होती.

उमेला एक डोंगरातली वाट दिसली त्या वाटेनं जायचं तिनं ठरवलं. वाट मोठी बिकट होती. ह्या खडकावरून त्या खडकावर उडी घेत उमा चपळपणे वर वर चढत होती. चढताना तिला धाप लागली. छातीला कळ आली. पण त्याचं उमेला काहीच वाटलं नाही.

उमा तशीच वर चढत राहिली. वरच्या शिखरावर एक योगी तप करीत बसला आहे, असं तिनं ऐकलं होतं. आपण नेट धरून त्याच्यापर्यंत पोचलो नि त्याला पूजलं तर तो कृपाळू होऊन आपल्याला शिवाकडे जायचा मार्ग सांगेल, असे तिच्या मनानं घेतलं. रात्रभर चंद्रशेखर शिवाचाच ध्यास तिला लागला होता.

त्या निर्जन डोंगर भागात वर वर चढत जाताना आपलं रक्त आनंदानं असं का सारखं उसळून येतंय ते तिला कळेना. पूर्वी कधी असं झालं नव्हतं. आपल्याला या वाटेने देवच नेताहेत हे तिला कसं कळावं ?

दुपारी एका गुहेत उमा विश्रांतीसाठी टेकली. तिला जराशी डुलकी लागली. तिनं डोळे उघडले

तेव्हा तिला आपल्यावर कुणीतरी पाळत ठेवतो आहे असं वाटलं. तिनं मान वळवली तोच काही तरी आपल्या जवळून सोनेरी हिरव्या विजेप्रमाणे चमकून गेल्याचा भास तिला झाला. नक्कीच त्या तीन आकृत्या होत्या.

त्या आकृत्या बर्फाने झाकलेल्या झाडातून गेल्या मात्र तोच झाडांची फांदी नि फांदी पानाफुलानी भरगच्च भरून गेलेली तिला दिसली. त्यावर फुले उमलली. त्यांचा सुगंध दरवळला.

'अरेच्या!'' उमा स्वतःशी म्हणाली. ''हा तर वसंतऋतूच आहे की.'' तिने पाहिलं तर आकाशात गरूड घिरट्या घालीत होते. लहानशा खारी आपल्या शेपटांवर बसून आनंदाने चित्कारत होत्या. उमा नेटाने पर्वत चढत होती. येताना बरोबर घेतलेली पूजासामग्री घट्ट धरून ती चालली होती. चालता चालता तिला एक तळे लागलं. त्या तळ्यातील पाण्यामध्ये आजूबाजूच्या डोंगरांचे प्रतिबिंब पडलं होतं. ''अहा!किती सुंदर!'' उत्सफूर्तपणे तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

आता उमेला चालताना दाट वन लागले. ती सरळ त्यात शिरली, वाट चालता चालता नवलाने बघू लागली. तिचा विश्वास बसेना; पण तरी समोरचं

दृश्य होतं. तिथे एक योगी समाधी लावून बसला होता. आजूबाजूला सर्वत्र शांतता होती. गवताचं पातं हलत नव्हतं की पाण्यावर लाट देखील सरकत नव्हती. काळसुद्धा तिथे नाहीसा होऊन गेला होता.

उमा स्तब्ध उभी राहिली. तिला जाणीव झाली की हा योगी दुसरा तिसरा कुणी नसून महादेवच आहे. कुणी न सांगताच तिला हे उमगलं. ती स्तब्ध उभी राहिली. तिचं हृदय भक्तिभावाने भरून आलं. ती त्याच्यासमोर गुडघे टेकून बसली. अत्यंत तल्लीनतेनं व भक्तीभावाने ती त्याच्याकडे बघू लागली.

त्याचक्षणी एका गंध तरूमागे लपून बसलेल्या त्या त्रिकुटाने-मदन, रती आणि वसंत यांनी-एकमेकांकडे पाहून स्मित केलं. वसंत हसला तशी थांबून राहिलेली कालचक्राची गती फिरून चालू झाली. आतापर्यंत दरीच्या प्रवेश द्वारापाशीच थबकून राहिलेला मधुमास तिथे अवतरला. निसर्ग जीवनकळेने बहरला, सौंदर्याने ओथंबला.

आता रतीची पाळी आली. तिनं आपली जादू टाकली आणि जीवजंतू, पशुपक्षी साऱ्यांच्या अंतःकरणात वासना, इच्छा निर्माण झाली. रतीदेवी कामदेवाकडे बघून हसली. तिनं त्याला खुणावलं. त्याबरोबर कामानं आपलं धनुष्य सरसावलं आणि

भात्यातला पुष्पबाण काढून नीट संधान साधलं.

पण तो बाण सोडताना त्याला आपल्याला कापरं भरल्यासारखं वाटलं. आपल्या तोंडाला कोरड पडल्यासारखं त्याला वाटलं. त्याचे हात बर्फासारखे थंडगार पडले. बाण रोखून धरलेला असतानाच त्याचं लक्ष महादेवाच्या कपाळाच्या मध्यभागी असलेल्या एका लहानशा रेघेकडे गेलं. कामदेव वृत्तीने चंचल होता. बुद्धीनंदेखील तो यथातथाच होता. पण तरीही ही रेषा सूतभर जरी हलली तर काय अनर्थ होईल ही जाणीव त्याला झाली आणि त्याचं काळीज भयाने गोठलं.

ती रेषा म्हणजे शिवाचा मिटलेला तिसरा डोळा होता. शिवाने तो डोळा नुसता किलकिला केला तरी सारं विश्व भस्मसात होईल असं सारेच म्हणत. कामदेवाला हे आठवलं नि त्याचे विचार तिथेच थांबले. तो भयानं कावराबावरा होऊन अविचल होऊन उभा राहिला. त्याचा धनुष्याला लावलेला बाण होता तसाच राहिला.

रतीनं कामदेवाची ही चलबिचल पाहिली. ती त्याच्या कानाशी अधीर होऊन पुटपुटली. "चल! त्वरा कर. घाबरू नकोस. सोड तो बाण..... आता आपलं साहस दाखव." रतीचे उद्गार ऐकून

कामदेव सावरला. त्याचं भय ओसरलं. तो बेछूट झाला. त्याचं जबाबदारीचं भान नष्ट झाल. त्याचे डोळे उद्दाम झाले.

"चल आटप आता. याक्षणी." वसंत कामदेवाच्या कानाशी लागून बोलला. क्षणार्धात कामदेवाचा अमोघ बाण त्या अनंतेश्वर महादेवाच्या काळजात वेगानं घुसला.

शिव जागा झाला. कालविहीन अवस्थेतून तो कालाच्या टप्प्यात आला. गतक्षण आणि प्राप्त क्षण यांना तोडणारा तो लवमात्र अवसर. पण तेवढ्यात शिवाच्या मनाची चलबिचल झाली. आपल्या पायाशी बसलेल्या सुंदर मुलीबद्दल विचार येतो न येतो तोच शिवाला काय झालं आहे त्याची जाणीव झाली. हृदयाजवळ किंचित वेदना झाल्याचा भास झाला. छातीवर किंचितसा ओरखडा नि रक्ताचा लहान कण ! आणि पायाशी एक डहाळी पडलेली, नि तिच्या टोकाशी फूल !

शिव त्या पुष्पबाणाकडे पहातच राहिला. त्याला हा कुणाचा बाण आहे ते कळलं. कळल्याबरोबर क्रोधानं महादेवाचं रक्त सळसळू लागलं. त्याला ठकवलं गेलं होतं. त्याच्या समाधीत विघ्न आणलं गेलं होतं.

जवळच शिवाला वसंत आणि कामदेव दिसले. त्या बेजबाबदार, मूर्ख तरुण जोडीनेच हे केलं होतं हे त्याने जाणलं. कामाने हा बाण आपल्यावर मारला. एवढं त्याचं धैर्य ? शिवाचा तिसरा नेत्र फडफडला. त्यातून डोळयांपुढे अंधारी आणणारा प्रकाशाचा झोत आला. शिव अंतर्धान पावला. तो होता तिथे आता हिमालयातल्या भयाण धुक्याच्या वर कुरळत वर जाणाऱ्या रेषा मात्र दृग्गोचर होत होत्या.

झाडांआड दडलेल्या काम आणि वसंत या दोघांनी तो सर्वभक्षी प्रकाशाचा झोत पाहिला मात्र आणि दुसऱ्या क्षणीच ते दोघे युवक होते त्या ठिकाणी भस्म होऊन पडले. आता त्यांची फक्त राख उरली होती.

उमा सभोवार पाहू लागली. क्षणापूर्वी साऱ्या वस्तू कशा जीवनानं रसरसलेल्या होत्या. आता त्या कोळपून त्यांची राखरांगोळी झाली होती. मृत्यूचं राखाडी राज्य सारीकडे पसरलं होतं. पहावं तिथं मरण्याची अवकळा भरली होती. क्षणापूर्वीचा पोपटांचा तो जिवंतपणा, त्यांची ती चर्पटपंजरी नाहीशी झाली होती. धुळीत इकडे तिकडे पडलेली

थोडीशी पिसं हीच त्यांची खूण काय ती उरली होती. फुलं करपली होती, गवत तपकिरी पडलं होतं. झाडांचे निष्पर्ण सांगाडे मात्र आकाशात घुसले होते.

पण सर्वात नवलाईची गोष्ट म्हणजे शिव ज्या उंचवट्यावर बसला होता तो उंचवटा जसाच्या तसा असला तरी पण पूर्ण रिकामा होता. उमा ज्याच्या पुढे गुडघे टेकून बसली होती तो शिव अदृश्य झाला होता. कधी नि कसं हे सारं घडलं ते तिला उमजेना. तिचे डोळे शिवाच्या डोळयांना भिडतात न भिडतात, तिचे ओठ त्याचं नाव घ्यायला उघडतात न उघडतात तोच हे अघटित घडलं होतं.

उमा उभी राहिली. कावरीबावरी होऊन ती चोहोकडे बघतच राहिली. त्या स्थितीतच कुणाच्या तरी रडण्याचा आर्त स्वर तिच्या कानी आला. तो स्वर जणू भाजलेल्या, पोळलेल्या पृथ्वीतूनच येत होता. त्याचा पडसाद त्या निर्जन डोंगरात विरून नाहीसा होत होता.

"कामा, माझ्या पतिदेवा, प्रियकरा ! हाय रे ! वसंता, माझ्या सुहृदा, आता माझं काय होणार ?. . . . माझं काय होणार ?"

उमेनं बाजूला वळून पाहिलं एक तरुणी छाती पिटत, केस उपटत आक्रोश करीत होती. कढत अश्रू

तिच्या गालांवरून वाहात होते. ती थंडगार, रूक्ष जमिनीवर सरपटत होती. तिच्यापुढे राखेचा एक ढीग पडला होता.

उमा तिच्याजवळ गेली. गुडघे टेकून तिच्याजवळ बसली " काय बाई ? काय झालं ?" तिनं हलकंच विचारलं.पण त्या स्त्रीचा विलाप सुरुच होता. ती रती होती.

रती आणि उमा या दोघींच्या भोवती भयाण भुतावळ फिरू लागली. डोंगरभर फिरत राहिली. पण रतीला त्यांची जाणीवच झाली नाही. तिला काही दिसत नव्हतं. तिचे डोळे फक्त त्या राखेच्या ढिगांकडे लागले होते. छाती बडवीत ती मोठमोठयाने आक्रंदत होती. आपल्या प्रियकराला आणि मित्राला परत येण्याकरता आर्जव करत होती.

उमेन त्या हतभागी स्त्रीला स्पर्श करण्याच्या हेतूने आपला हात लांब केला. पण ती स्पर्श करू शकली नाही. रतीचं दारुण दुःख दगडी भिंतीसारखं त्या दोघीजणींमध्ये उभं राहिलं. उमेची कणव व्यर्थ ठरली. अखेर उमेनं त्या उजाड उघड्या बोडक्या डोंगरात तिला तशीच एकाकी रडत सोडली आणि ती तिथून निघाली.

उमेचं काळीज काही वेळापूर्वी दुर्दम्य इच्छेनं

भरलं होतं. पण आता ते ओसाड झालं शिव तिला टाकून निघून गेला होता. उमेचं काळीज त्यासाठी आक्रोशित होतं. पण रतीसारखा तो विलाप नव्हता. तिचं दुःख खोल होतं. ते शब्दांनी किंवा अश्रूंनी व्यक्त होण्यासारखं नव्हतं.

"शिवाला शोधून काढलंच पाहिजे" उमेनं निर्धार केला." त्याला शोधत मी त्रिभुवन पालथं घालीन. त्याला शोधीन तेव्हाच राहीन. शिवाचा शोध लागेपर्यंत मी निजणार नाही की विसावा घेणार नाही " अशी प्रतिज्ञा करून त्या भयाण दरीतून ती बाहेर पडली.

"मला ते दोघे परत दे. परत दे." रतीच्या शोकाकुल आक्रोशानं ते शांत आणि स्तब्ध वातावरण भरून गेलं. "मला त्या दोघांशिवाय जगता यायचं नाही. पतीशिवाय मला अस्तित्वच नाही. रतीनं असा विलाप चालवला होता. भुतांच्या सावल्या तिच्या भोवती भिरभिरत होत्या. अखेर त्या दोघांची राख आपल्या पदरात गोळा केली आणि धडपडत, ठेचाळत ती त्या दरीतून बाहेर पडली.

ऐकणाऱ्याच्या काळजाला भोकं पडतील असा शोक करीत रती चालली होती. तिच्या विलापाने शुष्क, झोंबऱ्या वाऱ्यासारखं पृथ्वीला कापून टाकलं.

रतींचा आक्रोश ऐकून कावळ्यांच्या काळ्या झुंडी तिच्या मागे मागे जाऊ लागल्या. रती तप्त, तळपत्या आकाशातून हिंडली. कोरड्या, तपकिरी, जळून गेलेल्या पृथ्वीवर भटकली. तिच्या पायांना फोड आले. त्यातून रक्त ठिबकू लागलं. तिला पाहून माणसं भयानं थरारून जायची.

स्वर्गातून देव रतीकडे बघत होते. ती जाईल तिथे देव तिच्यावर लक्ष ठेवत होते. देवांनी ब्रह्मदेवालासुद्धा टोकले "ब्रह्मदेवा, तू हे काय करून बसलास बरं ? तुझ्या चतुर योजनेची काय फरफट झाली ते पहा !"

देवांच्या टोचून बोलण्यानं ब्रह्मदेव खजिल झाला. त्यानं मान खाली घातली. त्यानं पृथ्वीकडे पाहिले. त्याला पृथ्वीवरचं प्रेमच नष्ट होऊन गेलं आहे असं दिसलं. वसंतऋतूची राख-रांगोळी होऊन गेली आहे. या प्रेमहीन पृथ्वीवर प्रेम फुलणे थांबले होते. पशुपक्षी रत होत नव्हते. फुलांमधल्या परागांना शिवत नव्हते. युवक-युवतींच्या प्रेमलीला थांबल्या होत्या. ना कोणी गात होतं ना कोणी नाचत. साऱ्या जीवसृष्टीच्या सभोवार दुष्काळ आ वासून उभा होता. वाळवंटं भराभर पसरत होती. सर्वत्र जीवन उजाड होत होतं. जन्म होण्याची क्रियाच थांबली

होती. सर्वत्र मरणरूपी दुःख पसरलं होतं.

पिशाचासारखी झालेली, रोड, दुःखी रती ओसाडीतून धडपडत चाललेली ब्रह्मदेवाला आणि इतर देवांना दिसली. तिच्या तीव्र दुःखाचा आक्रोश अजूनही सुरूच होता

हताश नजरेने स्वर्गाकडे बघणारे मानव देखील देवांना दिसले. जमिनीवर पडून ते देवाची करूणा भाकीत होते. "आमच्या पापांची क्षमा करा. आमच्यावर दया करा. पृथ्वी फिरून फळू दे."

माणसांची प्रार्थना ऐकून देवांनी शरमेने आपल्या माना खाली घातल्या. त्यांच्याजवळ उत्तर नव्हतंच. ते स्वतःच दुबळे झाले होते. त्यांची रयाच गेली होती.

अखेर उत्तर आलं. पण ते देवांकडून नव्हे. पाताळ लोकातून. तारकासुर राहात होता त्या ठिकाणाहून उत्तर आलं. तारकासुर ब्रह्मदेवाची कठोर शब्दात निर्भत्सना करत होता, "मूर्ख, ब्रह्मदेवा, माझा मृत्यू घडवून आणण्यासाठी तूच नाही का प्रयत्न केलास ? वा रे वा !" मग तो देवांकडे वळला. "अडाणी देवांनो, ऐका, ब्रह्मदेवाचं स्वप्न भंगलं आहे. शिव नाहीसा झाला आहे. काम आणि त्याचा मित्र वसंत यांची राखरांगोळी झाली आहे. पृथ्वी वाळवंटासारखी ओस पडली आहे."

तारकासुराचा शब्दात उपराधाची धार होती. "शिवाचा मुलगा माझा वध करणार आहे. हो. हो. शिवाचा पुत्र. शिवाला मुलगा हाईल तेव्हा. बरं का ? कारण पृथ्वीवर प्रेमच मरून गेलं आहे आणि जन्म तर होतच नाही."

तो असुर फिरून बेफाम हसू लागला. त्याच्या हसण्याच्या प्रचंड आवेगाने डोंगर हादरले. आणि देवांची तोंडं उतरली.

उमा दरीतून बाहेर पडली त्यावेळी रतीचा आक्रोश चालू होता. तो आक्रोश उमेच्या कानात निनादू लागला. "कामा, माझ्या प्रियकरा, मी तुझ्यावाचून राहू शकत नाही." त्याचाच पडसाद तिच्या अंतःकरणात उमटला. "महादेवा, माझ्या प्रियकरा, तुझ्याशिवाय मी राहू शकत नाही."

'पण इथे अश्रूंचा काही उपयोग नाही.' उमा मनात म्हणाली, "मी शिवाचं रूप आणि महिमा एकदा बघितलं आहे. मला मागे फिरून चालायचं नाही. आता फक्त एकच मार्ग. शिवापर्यंत जाऊन पोहोचणं."

मग उमेने अत्यंत शांतपणे आपले दागिने

उतरविण्यास सुरुवात केली. "मी आता संन्यासिनी बनणार, ध्यान करणार. प्रार्थना करणार, उपास करणार. तप करणार. शिवाची भेट होईपर्यंत व्रतपालन करणार. रात्रंदिवस मी शिवाचा शोध घेणार. तो मिळेपर्यंत उग्र तपश्चर्या करणार. मग यात शतकं जावोत किंवा जन्म. मी शिवाचा शोध घेणारच." उमाने ठाम निश्चय केला.

उमा शिवाच्या शोधार्थ निघाली. रतीप्रमाणे तिनंही डोंगरदऱ्या पालथ्या घातल्या. अनवाणी तिनं वाळवंटं तुडवली. समुद्राच्या अथांग जलराशीत तिने शिवाला हुडकलं. असेल तिथं शिवाचा अखंड नामघोष ती रात्रंदिवस करत होती. तिची तीच साधना होती. तिचं तेच ध्यान होतं.

पांढऱ्या शुभ्र वस्त्रातली तिची कृश आकृती, तिचा लांबलचक वाऱ्याबरोबर मुक्तपणे हलणारा विपुल केशसंभार, तिचे आतल्या आत बुडलेले पण शोधक नि वेधक डोळे, हे स्त्रीपुरूषांच्या नजरेत भरत. उमा निरंतर शोध घेत होती. नि सतत चालत होती. कधी लोकांतून तर कधी एकटी.

उमेचा मार्ग सुकर नव्हता. या काळात पृथ्वीवर मृत्यूचे थैमान सुरु होते. लोकांमध्ये भयानक रोगांच्या साथी फैलावल्या. देवी आल्या, नंतर ज्वर आला.

शेकडो लोक साथीच्या रोगाने मरत होते. एकदा उमा उजाड, ओसाड भागातून चालत होती. वाटेत मेलेल्या प्राण्यांच्या नि माणसांच्या कवट्या नि हाडं पडली होती. यांच्यातून वाट काढीत तिला पुढे जावे लागलं. धूळ आणि उन्हाळा तर विचारण्यासारखेच नव्हते.

पण त्या साऱ्यातून शिवाचा नामजपच तिला ऐकू येई. नद्यांचं बर्फासारखं गार पाणी किंवा उन्हाने तापलेले खडकाळ डोंगर, ही सारी ठिकाणं तिला सारखीच वाटायची. तिला सारीच शिवाची पूजास्थानं होती. त्याचा शोध घेण्याची ती ठिकाणं होती. उमेच्या पदरी अन्न-पाणी, झोप-विश्रांती या गोष्टींना अर्थच उरला नव्हता. काळाचं भानही तिला राहिलं नाही. विचार थांबले. बोलणं बंद झालं. तिचे ओठ सारे शब्द विसरले. फक्त शिवाचं नाव त्या ओठांवर सतत खेळत राहिलं.

अशी शतकं गेली युगं उलटली आणि एक दिवस भगवी वस्त्र घातलेला एक जोगी तिला भेटला. तिच्याकडे पाहून तो हसला. त्याने हात उंचावून तिला आशिर्वाद दिला. "आपण मला शिवाचा ठिकाणा

सांगाल काय ?" उमेनं उत्सुकतेनं त्यांला विचारलं.

"शिव ?" आश्चर्यचकित झाल्यासारखा त्यानं प्रश्न केला. तुझं हे खडतर व्रत एवढं तप, सारं व्रत काय त्या शिवासाठीच ना ?"

"होय खरंच शिवासाठी. त्याच्याकडे जायचा मार्ग मला आपण दाखवाल का ?" उमानं पुन्हा उत्सुकतेने विचारलं.

जोगी खो खो करीत हसला. "तो वेडा ? तो भिक्षेकरी ? तो स्मशानात नाचणारा ?" त्या जोग्याने कुचेष्टेने विचारले. "मुली, मुली, अग तू तर राजकन्या आहेस. सुंदर आहेस. तरुण आहेस. तुला पुष्कळ वर मागणी घालतील. त्यांच्यापैकीच एकाला तू का माळ घालीत नाहीस ? ज्याला तू शिव म्हणतेस ना, त्या राकट, राख फासलेल्या जोगड्यापेक्षा त्यांच्यापैकी कुणीही खचित चांगला आहे. . ."

उत्तरादाखल उमा मंदसं हसली, खिन्न उदास हास्य हसली. "योगी महाराज, आपण काय म्हणता ते मला कळत नाही." शिवाचं अप्रतिम सौंदर्य, त्याची शक्ती, त्याच्याबद्दल तिला वाटणारं प्रेम यांच्याबद्दल ती त्याला सांगू लागली.

मग उमा शिवाचं गुणगान गाऊ लागली. त्या गाण्यामधून शिवाची असीमता, त्याचं सामर्थ्य,

त्याचा महिमा, त्याचं सर्वव्यापकत्त्व यांची थोरवी ती तन्मय होऊन वर्णन करू लागली. गाणं गाताना ती त्यात एवढी गुंग होऊन गेली की त्या योग्यात होणारं रूपांतर काही तिच्या लक्षात आलं नाही.

अखेर योग्याच्या जटेत जेव्हा चंद्रकोर झळकू लागली तेव्हा उमा दचकली. निस्तब्ध झाली. तिला एकदम कळून चुकलं की आपल्याला ज्याचा ध्यास लागला आहे, तोच हा महादेव आहे. शिवाचं मृदु, मधुर, विलक्षण सुंदर असं स्मित तिने पाहिलं.

शिवानं तिला मिठीत घेतलं तेव्हा तिच्या रोमारोमातून सुखानंद वाहू लागला. त्या क्षणी उमेला भावलं की आपणच सती आहोत, जगन्माता आहोत. प्रत्येक वस्तूच्या अंतरंगात खेळत असलेलं जीवन आपणच आहोत. उमा व महेश्वर दोघेही कैलासाला जायला निघाली. वियोगाचा दीर्घकाळ संपला होता.

वाटेत एक व्यक्ती लंगडत जवळ आली. ती रती होती. रती अगदी खंगली होती. ओढली होती. रोडावली होती. तिच्या अंगावर फक्त चिंध्या होत्या. रती अजून आपल्या पतीबद्दल रडून शोक करीत होती. तिनं शिवाची क्षमा मागितली.

शिवानं आपल्या पत्नीकडे पाहिलं. तिला त्यानं विचारलं, ''उमे, तुझं काय म्हणणं आहे ?''

उमेच्या डोळ्यात कणवेची आसवं दाटून आली. ''माझ्या वाट्याला जे सुख आलं आहे. त्यातला वाटा मी कुठल्याही जिवाला नाकारणार नाही.'' उमेचं हे उत्तर ऐकून शिवाने काम आणि वसंत यांना पुन्हा जिवंत करून रतीच्या स्वाधीन केल.

शिवानं काम व वसंत यांना त्यांची शरीरं दिली नाहीत. त्यांचे देह अगोदर जळून खाक झाले होते. शिवानं त्यांच्या आत्म्याना अमरत्व दिलं आणि त्यांचं अस्तित्व त्यानं साकारलं. रतीचं मन शांत झालं.

पृथ्वीवरच्या लोकांना वाऱ्याच्या झुळुकींचा मर्मर ध्वनी ऐकू येऊ लागला. पावसाच्या सौम्य धारा त्यांना दिसल्या. वसंत ऋतूचा चमत्कार फिरून सुरू आला. फुलं फुलली. पक्ष्यांचं कूजन सुरू झालं. युवक-युवतीच्या डोळ्यात प्रीतीचे रंग खेळू लागले. प्रेमिकांची कुजबुज सुरू झाली. जीवनाची आशा परतून आली.

कामदेव आता साऱ्यांच्या मनातच वास करायला लागला आहे हे सर्वांनाच जाणवलं. त्याचं ते उसाच्या दांडक्याचं धनुष्य आणि कुसुमबाण घेऊन तो नव्याने माणसांच्या मनात जन्मला आहे, मनोज झाला आहे. याचा आनंद काय वर्णावा ? लोकांनी कामदेव व

त्याचा सहचर वसंत यांचं स्वागत उत्सव साजरे करून केलं. लोक आनंदाने बेभान होऊन नाचू लागले. एकमेकांच्या अंगावर रंग उधळू लागले.

उमा आणि महादेव यांचं लग्न झालं. सारे देव झाडून त्या समारंभाला आले होते. वधूवराचं शुभ चिंतून सारे देव आपापल्या ठिकाणी परतले. तेव्हा तारकासुराच्या मृत्यूचा विचार त्यांच्या मनात घोळत होता. 'आता आपली चिंता दूर झाली. उमा आणि शिव यांना मुलगा होईलच. तारकासुर नष्ट झालाच पाहिजे.'

पण वर्षें उलटली तरी शिव आणि उमा यांना मुलगा झाला नाहीं. तेव्हा देव चिंतेत पडले. "शिवानं उमेला पुत्र होईल असा वर का दिला नाही ?" त्यांना प्रश्न पडला.

उमेचं लग्न शिवाशी झालं त्यावेळी तारकासुर नरमला होता. पण नंतर त्यांना संतान झालं नाही तेव्हा तो फिरून गुर्मीने वागू लागून अत्याचार करीत सुटला. निपुत्रिक शिवाची त्याने कुचेष्टा करण्यास सुरूवात केली. देवांना दरारा दाखवत तो स्वर्गलोक वारंवार तुडवू लागला.

शिवाला निपुत्रिकपणाबद्दल तारकासुर वारंवार टोमणे द्यायचा. पण शिवानं त्याला प्रत्युत्तर दिलं नाही. तो आपले विचार बोलून दाखवायचा नाही. उमेच्या हृदयात हसू असलं तरी ते ती ओठात उमटू द्यायची नाही. 'निपुत्रिकपणा ? त्या असुरानं खुशाल त्याच्यावर विश्वास ठेवावा' असंच जणू त्यांना सुचवायचे होतं.

कुणाला संशयही येणार नाही इतक्या गुप्तपणे एक गोष्ट घडली. सागरकिनारी पुळणीवर वाळूच्या राशीत एक लहानसं तेजस्वी बीज पडलं होतं. वाळूच्या कणाएवढं लहान. त्या बीजात शिवाचा मुलगा दडलेला होता.

ते बीज प्रखर तेजानं तळपत होतं. वाळूत पडलेल्या त्या बीजाचं तेज रणांगणात वापरल्या जाणाऱ्या शस्त्रासारखं दाहक होतं.

अग्निची दृष्टी सर्वांहून जास्त तीक्ष्ण. त्याने ते बीज स्वर्गातून प्रथम पाहिलं आणि तो क्षुब्ध झाला. समुद्रकाठी दुसरा अग्नि जन्माला आला आहे की काय ? असं त्याला क्षणभर वाटलं. पण मग त्यानं निरखून पाहिलं. उमेच्या डोळ्यात काळजी दिसत आहे असंही त्यानं जाणलं. त्याचा संशय फिटला. त्याला तिचं रहस्य कळलं.

'बीजाला आपण असुरक्षित ठेवता कामा नये' असा विचार अग्निच्या मनात आला. त्याचं तेज क्षणोक्षणी वाढत आहे. ते तारकासुराच्या लक्षात आलं तर ! अग्नि विचारमग्न झाला.

तेवढ्यात आपल्या कानात उमा बोलल्याचा भास अग्निला झाला. "अग्नि, गंगा माझी बहीण आहे. ती बीजाला लपवील. ती त्याला वाढवील. तारकासुरापासून मुलाचं रक्षण होईल."

वेगानं अग्नि समुद्रतीरी आला. शिवाच्या त्या मुलाला त्यानं उचललं आणि तो गंगेकडे जाऊ लागला. पुन्हा उमेचा आवाज ऐकू आला. "त्याचं नाव कार्तिकेय ठेवा." अग्नीने वर पाहिलं. उमा कैलासातल्या आपल्या घरात बसली होती.

वाळूच्या कणाहून सूक्ष्म असलेला तो कार्तिकेय गंगेच्या पाण्यात जलाशांबरोबर वाढला. गंगा त्याचे पालन पोषण करीत होती. प्रत्येक संकटापासून त्याचं रक्षण करून तिने त्याला लपवून ठेवलं. स्वतः वर्षानुवर्षं मिळवलेलं ज्ञान तिने त्याला दिलं. लहान असताना गाणी गाऊन तिने त्याला झोपवलं. पाळण्यात झुलवलं तो रडला तर त्याला जोजवलं. त्याच्यावर अनेक प्रकारे माया पाखडून गंगने जोपासलेला तो कार्तिकेय अतिशय देखणा झाला.

अतिशय देखणा आणि मानी झाला. त्याचं रूप आणि सामर्थ्य पाहून गंगेला धन्य धन्य वाटायचं.

पण एक दिवस कार्तिकेयाचं तेज इतकं दैदिप्यमान झालं की गंगेला त्याला लपवून ठेवणं अशक्य झालं. त्या दिवशी देवांना गंगेचं पाणी हजार सूर्यांच्या तेजाने तळपताना दिसलं. नदीच्या तळाशी त्यांना कार्तिकेय दिसला.

"हा आहे तरी कोण ?" त्याच्या तेजानं दिपून जाऊन देवांनी उत्सुकतेनं विचारलं.

अग्नी उत्तरला, "तो कार्तिकेय आहे. शिवाचा मुलगा."

देवांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. "शिवाचा मुलगा!"अत्यानंदानं ते ओरडत सुटले.

अग्निनं देवांना शांत होण्यास सांगितले. "तारकाला ही गोष्ट कळता कामा नये" त्याने देवांना बजावले.

पण देवांना रहावेना. ते कैलासाकडे धावत सुटले. उमेच्या पाया पडून त्यांनी विनवणी केली. "जगन्माते, कार्तिकेय आम्हाला दे. तारकासुराला जिंकायला त्याच्या शिवाय दुसरा कुणी नाही. तो आमचा सेनापती होईल.

गंगा आणि उमा यांच्यात केवढं अंतर! तरीसुद्धा

बायकामुलं, जमीन जुमला, गुरंढोरं यांचं संरक्षण कर. आमच्या सैन्याचं अधिपत्य कर. शत्रूचं निर्दालन कर."

कार्तिकेयानं आजूबाजूला पाहिलं. स्वर्ग अतिसुंदर होता. स्वर्गातले सूर्यबिंब उमटलेलं स्वर्गातले प्रासादांचे घुमट त्यानं पाहिले. त्याला तळपणारे रस्ते दिसले. स्वर्गात जिवंतपणा होता, जल्लोष होता. कैलासाहून हा लोक किती वेगळा होता!

कार्तिकेयाची नजर दूर कैलासाकडे वळली. त्याची शिखरं धुक्यांत बुडाली होती. सारं शांत निस्तब्ध होतं. त्याची दृष्टी गंगेकडे गेली. तिच्या पाण्याचा खळखळाट त्याने ऐकला. "मला तिथं एकटे पणाखेरीज काही दिसत नाही." कार्तिकेय आपल्याशीच म्हणाला.

मग कार्तिकेय देवाकडे वळला. "मी तुमच्या जवळ रहातो. स्वर्गच माझं घर. मी तुमच्याबरोबर तुमच्यासारखा राहीन." क्षणभर शिव, उमा, गंगा यांचे चेहरे त्याच्यासमोर तरळले आणि लगेच लुप्त झाले. देवांनी उचलून त्याला आपल्या खांद्यावर घेतलं आणि मिरवीत स्वर्गात नेलं.

Academy of Political &
Social Studies Pune
LIBRARY
C. No. ______ A. No. 1584
राव शांता रामेश्वर
सती उमा

Name of Borrower	Lent on	Recd on

पुराणातील कथा गेली हजारो वर्षे भारतातील आबालवृद्ध, स्त्री आणि पुरुष विलक्षण गोडीने ऐकत आहेत. **अक्षय कथा** या अंतर्गत अशाच काही प्राचीन कथांचा समावेश करण्यात आला आहे. मनोरंजन हा या कथांचा मूळ उद्देश असला आणि यातील पात्रांचा संबंध देव-धर्माशी जोडला गेला असला तरी या कथांतून अप्रत्यक्षपणे माणसाचे प्रेम, क्रोध, मत्सर यासारखे स्वभावविशेष प्रभावीपणे चित्रित केले आहेत. आधुनिक विज्ञानाने स्वीकारलेल्या अन्न-शृंखला यासारख्या संकल्पनाही जनमेजय आणि आस्तिक यासारख्या कथांमधून डोकावून जातात.

अक्षय कथातील या कथा मूळ इंग्रजीमध्ये, इंग्रजी बाल-साहित्याच्या प्रथितयश लेखिका श्रीमती शांता रामेश्वर राव यांनी लिहिल्या आहेत.मराठीमध्ये दुर्गा भागवत यांनी या कथाचे स्वैर भाषांतर अतिशय रसाळपणे करून दुग्धशर्करा योग घडवून आणला आहे.

अक्षय कथा या अंतर्गत खालील कथांवरची पुस्तके उपलब्ध आहेत.

आस्तिक आणि जनमेजय • कच आणि देवयानी • रुरु आणि प्रमद्वरा • दोन असुर बंधू • मनसादेवी • सती • उमा • सावित्री आणि सत्यवान • यम आणि मार्कंडेय

ओरिएंट लाँगमन

मुखपृष्ठ : बद्रीनारायण
सजावट : वसंत प्रधान

Rao/Bhagwat Sati • Uma (Marathi)
ISBN 0 86131 770 X
Rs.10.50

Root 1584

लेखिक
स्वैर